रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १८ ◆ अंक ९४
www.ramprahar.com
# राम प्रहर
◆ मंगळवार, २१ ऑक्टोबर २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

अंतरंग

'मनोमिलन नाटकाचे जोरदार प्रमोशन सुरू'/२
खोपोलीत दारूच्या नशेत कोयत्याने वार/५
रायगडच्या विद्यार्थ्यांचे लाठी स्पर्धेत सुयश/८



# जनसेवेचा दृष्टिकोन समोर ठेवून काम करा -आमदार प्रशांत ठाकूर

## पाली येथील 'उबाठा' पदाधिकारी, कार्यकर्ते भाजपमध्ये

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नागरिकांची सेवा करून त्यांच्या समस्या सोडवण्याचा दृष्टिकोन समोर ठेवून काम करा. यातून पक्षाची ताकद आणखी वाढेल, असे प्रतिपादन आमदार प्रशांत ठाकूर यांनी सोमवारी (दि. २०) येथे केले. ते पनवेल तालुक्यातील पाली येथील शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षातील पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांच्या भाजप प्रवेश कार्यक्रमात बोलत होते.

भाजपच्या माध्यमातून होत असलेला विकास तसेच आमदार प्रशांत ठाकूर यांच्या कार्यक्षम नेतृत्वावर विश्वास ठेवून विविध पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते 'कमळ' हाती घेत आहेत. यालाच अनुसरून वांगणी तर्फे वाजे ग्रामपंचायत हद्दीतील पाली गावचे शिवसेना उबाठा पक्षाचे ग्रामपंचायत सदस्य चिंतामणी शेळके यांच्यासह अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला. पनवेल मार्केट यार्डमधील श्री. रामशेठ ठाकूर सामजिक विकास मंडळाच्या सभागृहात झालेल्या या कार्यक्रमात आमदार प्रशांत ठाकूर यांच्यासह उपस्थित अन्य मान्यवरांनी प्रवेशकर्त्यांचे भाजपची शाल देऊन स्वागत केले.

कार्यक्रमास भाजप राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, तालुका सरचिटणीस राजेंद्र पाटील, पनवेल पूर्व मंडळ अध्यक्ष भूपेंद्र पाटील, तालुका चिटणीस यतिन देशमुख, सतीश शेळके, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष आनंद दवळे यांच्यासह इतर पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

या वेळी शिवसेना 'उबाठा'चे चिंतामणी शेळके, नयना शेळके, हरेश शेळके, स्वाती शेळके, महेश शेळके, चित्रा शेळके, सुभाष शेळके, भरत भोईर, रेखा भोईर, बारक्या शेळके, हनुमान शेळके, नितीन शेळके, भगवान शेळके, मच्छिंद्र शेळके, शाम शेळके, राम शेळके, जान्हवी शेळके, अजय शेळके, गुलाब शेळके, वैशाली शेळके, स्वस्तिका शेळके, वैजंती शेळके, हरेश शेळके, संतोष शेळके, प्रशांत भोईर, बारकी शेळके, कुणाल शेळके, इंद्राबाई शेळके, निलम भोईर यांनी भाजपमध्ये प्रवेश केला. प्रवेशकर्त्यांचा विश्वास सार्थ ठरवू, असे आमदार ठाकूर म्हणाले.

# भाजपकडून रानसई आदिवासीवाडीवर दिवाळी साजरी

## मंत्री आशिष शेलार यांची उपस्थिती; फराळ, शालेय साहित्याचे वाटप

**उरण : रामप्रहर वृत्त**

राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांनी रविवारी (दि. १९) उरणमधील रानसई आदिवासीवाडीवर येथील बंधू-भगिनी व मुलांसोबत दिवाळीचा सण साजरा केला. निमित्त होते आमदार महेश बालदी यांच्या माध्यमातून आयोजित आदिवासी समाजासाठी दिवाळी फराळ आणि विद्यार्थ्यांना शालेय वस्तू वाटप कार्यक्रमाचे.



या वेळी मंत्री आशिष शेलार म्हणाले की, माझ्या मुंबईतील मतदारसंघात बॉलीवूडमधील अनेक सेलिब्रिटी राहतात, मात्र आदिवासी बांधव निसर्गाचे जतन, संवर्धन, रक्षण करतात. त्यामुळे तेच खरे निसर्गाचे सेलिब्रिटी असून आज त्यांच्यासोबत रानसई येथे दिवाळी साजरी करण्यासाठी आलो आहे. आमदार महेश बालदी यांच्या आश्वासनानुसार उरण मतदारसंघातील आदिवासींची कुडाची घरे मॉडर्न आदिवासी व्हिलेज या संकल्पनेनुसार पक्की बांधून दिली जात आहेत. तुमच्या मूलभूत गरजा पूर्ण करू. या वेळी त्यांनी आदिवासींच्या घरी दिवाळीचा फराळ केला.

या कार्यक्रमाला भाजपचे ज्येष्ठ नेते जे.एम. म्हात्रे, जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, पनवेल पश्चिम मंडळ अध्यक्ष रूपेश धुमाळ, माजी जि.प. सदस्य जीवन गावंड, आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी तेजस्विनी गलांडे, चंद्रकांत घरत, विद्याधर जोशी आदी उपस्थित होते.

# आज पनवेलमध्ये 'दिवाळी पहाट'

## सुप्रसिद्ध गायिका बेला शेंडे यांच्या सुरेल गीतांची पर्वणी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



पनवेल महानगरपालिका आयोजित आणि श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ प्रायोजित 'दिवाळी पहाट' अर्थात सुश्राव्य संगीत मैफिल मंगळवारी (दि. २१) सकाळी ५.३० वाजता पनवेल शहरातील वडाळे तलाव येथे होणार आहे. या कार्यक्रमात सुप्रसिद्ध व लोकप्रिय गायिका बेला शेंडे आपल्या सुमधुर आवाजात विविध सुश्राव्य गीते सादर करतील.

दीपावलीच्या आनंददायी वातावरणात बेला शेंडे यांच्या स्वरांची जादू अनुभवण्याची संधी पनवेलकरांना मिळणार आहे. यंदाचे हे 'दिवाळी पहाट'चे नववे वर्ष असून गेल्या काही वर्षांपासून पनवेलकरांसाठी ही सांगीतिक सकाळ एक अविस्मरणीय परंपरा बनली आहे. नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या संगीतमय पर्वणीचा आस्वाद घ्यावा, असे आवाहन पनवेल महापालिका आणि श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ यांच्या वतीने करण्यात आले आहे. यनिमित्ताने दिवाळीच्या मंगलमय वातावरणात सुरेल स्वरांनी पनवेल शहर उजळून निघणार आहे.

# ज्येष्ठ अभिनेते असरानी यांचे निधन

**मुंबई : प्रतिनिधी**



बॉलीवूडमधील दिग्गज अभिनेते आणि कॉमेडिअन गोवर्धन असरानी यांचे सोमवारी (दि. २०) निधन झाले. फुफ्फुसांच्या समस्येमुळे गेल्या काही दिवसांपासून असरानी यांना आरोग्य निधी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते.

शोले या सिनेमातून असरानी यांनी केलेली जेलरची भूमिका अनेकांच्या आजही स्मरणात आहे. हम अंग्रेजों के जमाने के जैलर हैं! हे त्यांचे वाक्य प्रचंड गाजले होते. आसरानी यांच्या निधनाने शोक व्यक्त होत आहे.










# मनोमिलन नाटकाचे जोरदार प्रमोशन सुरू; एकनाथ शिंदेंचा उद्धव अन् राज ठाकरेंना टोला

**अंबरनाथ : रामप्रहर वृत्त**

भाऊबंदकी नावाचे नाटक एकेकाळी फार गाजले होते, मात्र आता मनोमिलन नाटकाचे जोरदार प्रमोशन सुरू झाले आहे असे म्हणत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उद्धव आणि राज ठाकरे बंधूंवर जोरदार टीका केली. आम्ही कामाने ' पछाडलेली' लोकं असल्याने आमच्या कामांचा 'धूमधडाका' पाहून विरोधकांचा 'थरथराट' होत असल्याची मिश्किल टिप्पणी त्यांनी केली.

अंबरनाथमधील धर्मवीर आनंद दिघे नाट्यमंदिराचे पद्मश्री अशोक सराफ यांच्या हस्ते लोकार्पण पार पडले. या कार्यक्रमात एकनाथ शिंदे म्हणाले की, स्वर्गीय आनंद दिघे यांच्या नावाने अंबरनाथ मध्ये उभ्या राहिलेल्या या नाट्यगृहाच्या



निर्मितीमुळे ठाणे आणि कल्याण–डोंबिवलीच्या प्रेक्षकांना न जाता आता येथेच दर्जेदार नाटकांचा आस्वाद घेता येईल.

ज्यांनी या नाट्यगृहाची संकल्पना मांडली, बांधकाम केले. त्या सर्वांचे मी अभिनंदन करतो. डॉ. श्रीकांत शिंदे यांनी हे नाट्यगृह साकार करून अंबरनाथच्या सांस्कृतिक इतिहासात सुवर्णपान जोडले गेले असल्याचे सांगितले.

तसेच अशोक सराफ हे नाट्यकलेचे चालते–बोलते विद्यापीठ आहेत. त्यांना महाराष्ट्र भूषण पुरस्कार देण्याचा योग मला आला. आज इतके दिग्गज कलाकार येथे एकत्र आल्याने जणू काही अंबरनाथमध्ये तारांगणच अवतरले आहे. अशोक सराफ यांचे एक खूप गाजलेले नाटक आहे, सारखे छातीत दुखतय, शिवसेनेचे यश पाहून देखील काही लोकांच्या पोटात दुखते असा चिमटा शिंदेंनी विरोधकांना काढला. मी कोणावर टीका करत नाही पण मी आरोपाला नेहमी कामातून उत्तर दिले असल्याचंही एकनाथ शिंदेंनी म्हटलं.

# इन्फिनिटी फाउंडेशनतर्फे आपटा गावात जॉय कॅम्प व दीपोत्सवाची रंगत

**पनवेल : रामप्रहर वृत**



इन्फिनिटी फाउंडेशनतर्फे दिवाळीच्या निमित्ताने पनवेल तालुक्यातील आपटे गावातील आदिवासी वाडीत 'जॉय कॅम्प' आयोजित करण्यात आला. या उपक्रमांतर्गत वस्त्रदान मोहीम, फराळ वाटप, तसेच स्वच्छता मोहिमेचे आयोजन करण्यात आले.

या शिबिराचा मुख्य आकर्षण होता २५० वर्षे जुन्या शिव मंदिर परिसरातील 'दीपोत्सव', ज्यामध्ये फाउंडेशनच्या स्वयंसेवकांनी मिळून २०० हून अधिक दिवे प्रज्वलित केले. संपूर्ण परिसर दिव्यांच्या प्रकाशाने उजळून निघाला आणि ग्रामस्थांसाठी हा आनंदाचा सोहळा ठरला.

या उपक्रमाचा उद्देश फक्त दिवाळी साजरी करणे नव्हे, तर आदिवासी बांधवांसोबत सणाचा आनंद वाटणे आणि त्याचबरोबर प्राचीन वारसा आणि संस्कृतीचे जतन करणे हा होता. या मध्ये विद्यार्थ्यांनी व स्वयंसेवकांनी उत्साहाने सहभाग घेत सामाजिक बांधिलकीचे उदाहरण घालून दिले.

या उपक्रमासाठी इन्फिनिटी फाउंडेशनचे अध्यक्ष आयुफ अकुला उपाध्यक्ष मिहिर रेड्डी, समन्वयक शीतल घारगे, सरचिटणीस झीरपरू उसात्कार, सरचिटणीस यश दुबे व इतर सदस्य उपस्थित होते अयुफ आकुला यांनी या प्रसंगी सांगितले की,आमचा दीपोत्सव केवळ दिवे लावण्याचा नव्हे, तर प्रत्येकाच्या मनात आशा, ऐक्य आणि संस्कृतीची ज्योत प्रज्वलित करण्याचा प्रयत्न आणि त्याचे पुनरुज्ञीवन करणे हीच खरी सेवा आहे.

# सातारा वाईतील झेंडू फुलांसमोर पोलादपुरातील झेंडू फुलांचे आव्हान





**पोलादपूर : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील पोलादपूर, महाड आणि माणगांव सह रत्नागिरी जिल्ह्यातील खेड, मंडणगड आणि दापोली तालुक्यांतील शहराच्या बाजारपेठांमध्ये दरवर्षी नवरात्र, विजयादशमी आणि दिवाळी सणानिमित्त सातारा जिल्ह्यातील वाई परिसरातील झेंडू फुलांच्या राशी घेऊन शेतकरी विक्रीसाठी उतरत असताना पोलादपूर तालुक्यात यंदा प्रथमच तालुक्यातील करंजे येथील स्थानिक शेतकऱ्याने परजिल्ह्यातील झेंडू फुले विक्रेत्यांसमोर आव्हान उभ केले.

पोलादपूर करंजे येथील सहयाद्री पर्वतराजींतील हवामान थंड आणि पावसात पाण्याचा लवकर निचरा होत असल्याने शेतकरी नेहमी प्रयोगशील असतात. गेल्यावर्षी झेंडू फुलांचा भाव १२० रूपये प्रतिकिलोपेक्षा वर असल्याने अंगणात दोन–चार रोपांवर पाच पंचवीस फुले उगवत असल्याचा अनुभव असलेल्या विठोबा बाबू घाडगे या शेतकऱ्याने यंदा झेंडूच्या फुलांच्या रोपांची लागवड मोठया प्रमाणात करण्याचे ठरविले. यासाठी त्याने तालुका कृषी कार्यालयाचे उपकृषी अधिकारी श्रीरंग मोरे व अन्य तज्ज्ञांचे मार्गदर्शनही घेतले.

साधारणपणे एक एकरावर लावलेल्या झेंडूच्या केशरी आणि पिवळया फुलांना नवरात्रीपासून कळयांचे गोंडे येऊ लागले. त्यामुळे काही झेंडू फुलांची काढणी नवरात्री उत्सवकाळात करून कमी प्रमाणात पोलादपूर शहरात विक्रीस आणणाऱ्या विठोबा घाडगे यांनी विजयादशमीपूर्वी पडलेल्या लख्ख सूर्यप्रकाशामध्ये कळयांचे गोंडे मोठया संख्येने उमलल्याचे पाहून मोठया प्रमाणात फुले खुडून पोलादपूरच्या मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्ग आणि महाबळेश्वर फाटयाजवळ राशी ओतल्या. यावेळी काही तास पावसाने उघडीप दिली असताना ताजी फुले पाहून ग्राहकांनी फुलांसाठी मोठया प्रमाणात झुंबड केल्याचे दिसून आले.

सातारा आणि वाई येथून येणाऱ्या फुलविक्रेत्यांकडून झेंडूची फुले प्रतिकिलो १२० ते १६० रूपये प्रतिकिलो दराने विक्रीस ठेवली जात असताना घाडगे यांनी केवळ १०० रूपये प्रतिकिलो दर लावून ताज्या फुलांच्या राशी रस्त्यालगत दिवाळीनिमित्त ओतून ग्राहकांना आवाज देऊन आकर्षित करण्यापेक्षा या फुलांचा मंद सुगंधच ग्राहकांना ती फुले ताजी असल्याची जाणीव निर्माण करून खरेदीसाठी आकर्षित करीत असल्याचे दिसून आले. केवळ ताजेपणा आणि टवटवीतपणाच नाही तर मंद नैसर्गिक सुगंध असलेल्या फुलांमुळे विठोबा घाडगे यांनी गेल्या दोन दिवसांत ५०० किलो फुले विकून ५० हजार रूपयांची बेगमी केली. अजून दोन दिवस दिवाळीनिमित्त विक्री करण्याची संधी असल्याने घाडगे यांचे आप्तकुटूंबिय दिवसभर फुलांची खुडणी करून दुसऱ्या दिवसाच्या बाजारातील विक्रीची तयारी करीत आहेत. कौटूंबिक सहकार्यामुळे या व्यवसायात या हंगामात सणासुदीला लाखभर रूपयांची झेंडूफुलांची विक्री करून धंद्याची चांगलीच सुरूवात झाल्याचे विठोबा घाडगे यांचे म्हणणे असून दोन दिवसांत तालुक्यातील काही शेतकऱ्यांनी लागवडीबद्दल चाकशी करून पुढच्या वर्षी आम्हीपण फुले घेऊन विकायला येऊ, अशी उत्स्फूर्त मानसिकता व्यक्त केल्याने परजिल्ह्यातील फुलविक्रेते शेतकऱ्यांसमोर पोलादपूर तालुक्यातील शेतकरी आव्हान उभे करण्याची तयारी करू लागले आहेत.

# दिव्यांग मुलांसमवेत रमले पालिका आयुक्त; ईटीसी केंद्रात साजरी झाली दिवाळी

**नवी मुंबई : बातमीदार**

महानगरपालिका ईटीसी अपंग शिक्षण, प्रशिक्षण व सेवासुविधा केंद्राद्वारे दिव्यांग मुलांना सर्व सामाजिक सोहळे, आपल्या परंपरा, संस्कृती यांची माहिती व्हावी या हेतूने विविध उपक्रम राबविले जातात. त्या अनुषंगाने दरवर्षीप्रमाणे यंदाही दिव्यांग मुलांसमवेत दिवाळी साजरी करण्यात आली.



विशेष म्हणजे यावेळी या दिव्यांग मुलांच्या आनंदात सहभागी होण्यासाठी नवी मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त. डॉ. कैलास शिंदे हे उपस्थित राहिल्याने दिव्यांग मुलांचा आनंद द्विगुणित झाला. वसुबारस म्हणजे दिवाळीचा पहिला दिवस त्यामुळे ईटीसी केंद्रामध्ये आयुक्तांच्या हस्ते गोमातेची प्रतिकात्मक पूजा करण्यात आली.

दिवाळीनिमीत्त संपूर्ण केंद्रात रांगोळी काढून सजावट करण्यात आली होती. मुलांनी बनवलेले आकाश कंदिल, पणत्यांची आरास याने केंद्र सुशोभित करण्यात आले होते. यावेळी मोठया संख्येने दिव्यांग मुले त्यांच्या पालकांसह उपस्थित होती.यावेळी कार्यक्रमाचे प्रास्ताविक व पाहुण्यांचे स्वागत इटीसी केंद्राच्या संचालिका डॉ. अनुराधा बाबर यांनी केले. दिव्यांग मुलांनी बनविलेल्या पणत्या आणि तुळशीचे रोप देऊन छोट्या दिव्यांग मुलांनी आयुक्तांना दिवाळी शुभेच्छा दिल्या.

महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी यावेळी उपस्थितांशी बोलताना पालक हे दिव्यांग मुलाचे पहिले विशेष शिक्षक असल्याचे सांगून इटीसी केंद्रामध्ये शिक्षण, उपचार यासोबत दिव्यांग मुलांना व्यावसायिक शिक्षण तसेच प्रदर्शनासारख्या उपक्रमातून रोजगार उपलब्ध व्हावा यासाठी यापुढील काळात नियोजन करण्यात येईल असे सांगितले.मुख्यालय व ईटीसी केंद्र येथे आयोजित करण्यात आलेल्या दिव्यांग विद्यार्थी, व्यक्ती व त्यांच्या पालकांनी बनविलेल्या वस्तू पाहून आयुक्तांनी दिव्यांग मुले व त्यांच्या पालकांचे कौतुक केले. यावेळी आयुक्तांनी आपल्या हस्ते दिवाळीनिमित्त. मुलांना खाऊ वाटप केले.

यावेळी आयुक्तांनी कौतुकाने उचलून घेतलेली एक कर्णबधीर चिमुरडी मुलगी नंतर त्यांच्या कडेवरून उतरायलाच तयार नव्हती त्यामुळे आयुक्तांसह सर्वच आश्चर्यचकीत झाले. स्वत: आयुक्त या दिवाळी उत्सवात सहभागी झाल्याने दिव्यांग मुलांचा व त्यांच्या पालकांचा आनंद ओसंडून वहात होता.

# अतिरिक्त आयुक्तांच्या स्वाक्षरीचे खोटे आदेश; नवी मुंबई पालिकेने केले नागरिकांना आवाहन

**नवी मुंबई : बातमीदार**

महानगरपालिका आरोग्य विभागांतर्गत विशेष उमेदवार निवड प्रक्रिया २०२५ अंतर्गत स्टाफ नर्स / नर्सिंग ब्रदर पदासाठी निवड व नियुक्तीचे अतिरिक्त आयुक्त श्री. सुनील पवार यांची स्वाक्षरी असलेले खोटे आदेश नवी मुंबई महानगरपालिका आरोग्य विभाग असा मजकूर असलेल्या खोट्या लेटरहेडवर समाज माध्यमांवरून फिरत असल्याचे निदर्शनास आले आहे. अशा प्रकारचे कोणतेही आदेश नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने जारी करण्यात आलेले नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी असे आवाहन नवी मुंबई पालिकेने केले आहे.

सदर खोट्या आदेशांबाबत नमुंमपा आरोग्य विभागामार्फत पोलीस ठाण्यात रितसर तक्रार दाखल करण्यात येत असून नागरिकांनी अशा प्रकारच्या खोट्या बातम्यांवर विश्वास ठेवू नये व कोणत्याही प्रकारच्या फसवणुकीला बळी पडू नये. नवी मुंबई महानगरपालिके मार्फत ६६८ पदांकरिता भरतीची लेखी परीक्षा झालेली असून त्याची निवड प्रक्रिया सुरू आहे. सदर आदेशाचा त्या भरती प्रक्रियेशी कोणत्याही प्रकारचा संबंध नाही याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

या भरतीबाबत महानगरपालिकेची वेबसाईट यावरून तसेच अधिकृत सोशल मीडिया हँडलवरून योग्य व सत्य माहिती जाणून घ्यावी असे आवाहन करण्यात आले आहे.

# दिवाळीच्या खरेदीसाठी नागरिकांची गर्दी; वाहतूक कोंडी

**पनवेल : वार्ताहर**

दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर पनवेल शहरात खरेदीसाठी नागरिकांची मोठ्या प्रमाणावर गर्दी होत आहे. तालुक्यातून विविध भागांमधून आलेल्या नागरिकांनी मुख्य बाजारपेठेत खरेदीसाठी मोठी वर्दळ केली. त्यामुळे छत्रपती शिवाजी महाराज चौक, जुनी तहसील कचेरी परिसर, रेल्वेस्थानकाकडून शहरात येणारा मार्ग तसेच मुख्य मार्गांवर तीव्र वाहतूक कोंडी निर्माण झाली होती.

चारचाकी मोटारी घेऊन आलेल्या नागरिकांची संख्या वाढल्याने शहरातील वाहनतळ पूर्ण भरले असून पार्किंगसाठी जागा मिळेनाशी झाली आहे. परिणामी चालकांनी गाड्या उपलब्ध जागेत उभ्या केल्याने रस्त्याची क्षमता कमी झाली. याशिवाय छत्रपती शिवाजी महाराज चौकाजवळील पोलीस चौकी परिसरातच काही वाहनचालक आपली वाहने उभी करीत असल्याने वाहतुकीचा वेग पूर्णपणे खंडित होत आहे.

# रयत शिक्षण संस्थेच्या मॉडर्न स्कूलमध्ये दुर्ग प्रतिकृती निर्मिती स्पर्धा

**नवी मुंबई : बातमीदार**

शासनातर्फे दुर्गोत्सव २०२५ अमृत महाराष्ट्र या उपक्रमाअंतर्गत शाळास्तरावर दुर्ग (किल्ले) प्रतिकृती निर्मिती स्पर्धा घेण्याचे आवाहन करण्यात आले होते. त्यानुसार रयत शिक्षण संस्थेची मॉडर्न स्कूल, वाशी येथे उत्साहपूर्ण वातावरणात ही स्पर्धा आयोजित करण्यात आली.

विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली रायगड, राजगड, प्रतापगड, सिंधुदुर्ग, साल्हेर, खांदेरी, जिंजी, पन्हाळगड, शिवनेरी, विजयदुर्ग, लोहगड व पद्मदुर्ग या युनेस्कोने जागतिक वारसा म्हणून मान्यता दिलेल्या १२ किल्ल्यांपैकी रायगड राजगड प्रतापगड आणि साल्हेर या किल्ल्यांच्या प्रतिकृती अत्यंत कल्पकतेने तयार केल्या.

प्रत्येक गटाने आपला किल्ला तयार करताना त्याचे चित्रीकरण (व्हिडिओ) केले. विद्यार्थ्यांसोबत शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनीही उत्साहाने सहभाग घेतला. तयार केलेल्या किल्ल्यांचे फोटो व व्हिडिओ संकेतस्थळावर अपलोड केले आहेत.



# दिवाळीच्या सुट्टीत नवी मुंबईत बालनाट्य शिबिराचे आयोजन

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई बालरंगभूमी आणि संत शिरोमणी कला मंच यांच्या संयुक्त विद्यमाने २४ ऑक्टोबर ते २ नोव्हेंबर २०२५ या दिवाळी सुट्टीतील कालावधीमध्ये वाशीतील विष्णुदास भावे नाट्यगृह येथे बालनाट्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. दिवाळी आणि उन्हाळी शालेय सुट्टीतील कालावधीमध्ये या शिबिराचे नियोजन करण्यात येत असून मुलांना रंगभूमी आणि अभिनय कौशल्य विकसित करण्यासाठी या बालनाट्य कार्यशाळेचे आयोजन करण्यात येते.



नाटककार श्रीहरी पवळे यांनी २९ वर्षापासून सुरु केलेले नवी मुंबईतील हे पहिले बालनाट्य शिबिर आहे. या बाल नाट्य शिबीरामध्ये संवाद, शरीराची भाषा भावनिक अभिव्यक्ती, नेपथ्य, प्रकाश योजना महत्त्व समजावले जाते व त्याचा वापर कसा करावा हे शिकविले जाते. चेहऱ्यावरील विविध प्रकारचे रंग लावून पात्र निर्मिती केली जाते. या कार्यशाळेत मुलांमध्ये आत्मविश्वास व सर्जनशीलता वाढवण्यात आणि सांघिक काम करण्याची कौशल्य विकसित करण्यास मदत होते.

या बालनाट्य अभिनय कार्यशाळेत नाट्य कलेचे विविध पैलू शिकविण्यात येतात त्यांना रंगपंचावर स्वतला व्यक्त करण्याची संधी मिळते मुलांच्या कल्पनांवर आधारित नाटय़निर्मिती सादरीकरणही होते. बालनाट्य अभिनय मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी एक उत्कृष्ट मार्ग आहे हे त्यांना व्यक्त करण्याची संधी मिळते. मुलांच्या कल्पनांवर आधारित नाटय़निर्मिती सादरीकरणही होते बालनाट्य अभिनय मुलांच्या हे त्यांना सर्जनशील आत्मविश्वासी आणि सामाजिक दृष्या सक्षम बनविण्यास मदत होते.

हे बालनाट्य अभिनय शिबिर शुक्रवार दिनांक २४ ऑक्टोबर पासून रोज सायंकाळी पाच ते सात या वेळेत विष्णुदास भावे नाट्यगृह वाशी येथे होत आहे. नवी मुंबईतील बालकलाकारांनी लाभ घेऊन आपल्या कला सुप्त गुणांना वाव द्यावा असे आवाहन नाटककार श्रीहरी पवळे यांच्याकडून करण्यात आले आहे. यापूर्वीचे सभासद असलेल्या बालकलाकारांना विनामूल्य प्रवेश दिला जाणार आहे.

# डिपॉझिट परत देण्याच्या वादातून चाकूने भोसकले

**पनवेल :** डिपॉझिट परत देण्याच्या वादातून आरोपीने भोसकल्याची घटना पनवेल शहरातील वडाळे तलाव परिसरात घडली आहे. आरोपी आनंद जाधव यांनी २ लाख रू हेवी डिपॉझीट वरती फिर्यादी यांचे भावाचे नावे असलेली सदनिका भाडे तत्त्वावर घेतली होती. आरोपी याचे सोसायटीमधील सदस्यांशी वाद झाल्याने आरोपी आनंद जाधव याने फिर्यादी गोवीद राठोड यांचेकडे डिपॉझीटचे पैसे परत मागीतले असता सदरचे पैसे देण्यासाठी फिर्यादी हे वडाळे तलाव परिसरामध्ये गेले असता आरोपी आनंद जाधव याने माझे पुर्ण पैसे मला परत कर असे बोलुन फिर्यादी यांची कॉलर पकडुन त्यांना शिवीगाळ करून आरोपीने त्याचे जवळील चाकू फिर्यादी यांचे पोटामध्ये उजव्याबाजुस खुपसुन फिर्यादी यांना जीवे ठार मारण्याचे उद्देशाने गंभीर जखमी केले म्हणुन पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## दुखवटा

### रघुनाथ वर्तक


**पेण** : तालुक्यातील मोठे वढाव येथील आदर्श व्यक्तिमत्व असलेले रघुनाथ नामदेव वर्तक गुरुजी यांचे वयाच्या ९४व्या वर्षी



निधन झाले. संत तुकाराम महाराज मंडळाच्या व गुरुदेव हभप रसाळ महाराजांच्या मोठे वढाव संस्थेचे ते सदस्य होते. ए टी पाटील सागर विद्यालय वाशी या शाळेचे ते सचिव होते. आगरी विकास मंच पेण या संस्थेचे संचालक होते. त्यांच्या पश्चात एक मुलगा व चार मुली व नातवंडे असा परिवार आहे त्यांचा दहावा व बारावा एकाच दिवशी शुक्रवार २४ ऑक्टोबर २०२५ रोजी त्यांच्या राहत्या घरी मोठे वढाव येथे होईल.

### रघुनाथ केणी


**उरण :** चिरनेर, कातळपाडा येथील कोकण एज्यूकेशन सोसायटी सेकंडरी स्कूल चिरनेरचे निवृत्त नाईक रघुनाथ बाळाराम



केणी (९१)यांचे नुकतीच वृद्धपकाळाने दुःखद निधन झाले आहे.नाईक रघुनाथ केणी यांच्या अंत्य दर्शनासाठी विविध क्षेत्रातील मान्यवरांसह त्यांचे शिक्षण क्षेत्रातील स्नेही,नातेवाईक,मित्रमंडळी आणि हितचिंकांनी गर्दी केली होती.त्यांच्या मागे त्यांचे तीन मुलगे,सासुरवाशिन मुलगी आणि नातवंडे असा त्यांच्या परिवार आहे.

### राधाबाई नलावडे

**खालापुर :** खरसुंडी येथील राधाबाई बापुराव नलावडे यांचे शुक्रवार दिनांक १७ ऑक्टोबर रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्या ९० वर्षाच्या होत्या.त्यांचे दशक्रिया विधी रविवार दि.२६



ऑक्टोबर रोजी श्री क्षेत्र उद्धर रामेश्वर येथे होणार आहे तसेच त्यांचे उत्तरकार्य रविवार दिनांक २९ ऑक्टोबर रोजी खरसुंडी येथे त्यांच्या निवासस्थानी होणार आहे. त्यांच्या पश्चात त्यांचा मुलगा यशवंत नलावडे, संदीप नलावडे, आत्माराम नलावडे आणि पुतणे, बहिणी, सुना, नातवंडे, पंतवडे, जावई, असा मोठा परिवार आहे.

# दीपावलीनिमित्त सुरेल स्वरांची पर्वणी; श्रोते मंत्रमुग्ध

## कळंबोली येथे दिवाळी पहाट कार्यक्रम



**कळंबोली : रामप्रहर वृत्त**

कळंबोली येथे सोमवारी सकाळी भव्य दिवाळी पहाट कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे आयोजन माजी नगरसेवक बबन मुकादम आणि भाजप महिला मोर्चाच्या जिल्हा अध्यक्षा प्रिया मुकादम यांनी केले होते. कार्यक्रमात मनमोहक सूरांच्या गंगेत रसिक नागरिक हरवून गेले.

या सोहळ्यास आमदार प्रशांत ठाकूर, आमदार विक्रांत पाटील, उत्तर रायगड जिल्हा भाजप अध्यक्ष अविनाश कोळी, शिवसेना महानगरप्रमुख रामदास शेवाळे, भाजप जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, माजी विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे, भाजप शहराध्यक्ष अमर पाटील तसेच शिवसेनेचे शहरप्रमुख तुकाराम सरद व रविशेठ पाटील यांच्यासह अनेक मान्यवरांनी उपस्थिती लावली.

दिवाळी पहाट कार्यक्रमात प्रेक्षकांसाठी मराठी आणि हिंदी गाण्यांची स्वरमाधुरी सादर करण्यात आली. सुप्रसिद्ध गायक सागर म्हात्रे, गायिका नेहा कणे आणि श्रद्धा माळी यांच्या सुरांनी वातावरण भारावून गेले.

या प्रसंगी आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले, बबन मुकादम आणि प्रिया ताई यांनी कळंबोलीत दिवाळी पहाट सुंदर कार्यक्रम आयोजित केला आहे. कार्यक्रम कसा असावा, तो यशस्वी कसा व्हावा याचं उत्तम उदाहरण म्हणजे मुकादम दाम्पत्य. त्यांनी जी जबाबदारी स्वीकारली, ती नेहमीच यशस्वीरीत्या पूर्ण केली आहे. नागरिकांना प्रत्येकवेळी एक जिवंत अनुभव देणारा कार्यक्रम ते सादर करतात. या दिवाळी पहाट कार्यक्रमाने कळंबोलीत सांस्कृतिक रंग भरले.

## भाजप कळंबोलीतर्फे 'दिवाळी संध्या' रंगली



**कळंबोली : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पार्टी, कळंबोली यांच्या वतीने रविवारी कळंबोली येथे भव्य दिवाळी संध्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. मराग, ताल आणि भावनांची सुरेख संगत दीपउत्सवाची दिवाळी संध्याफया संकल्पनेवर आधारित हा संगीतमय कार्यक्रम रसिक श्रोत्यांसाठी एक अनोखी पर्वणी ठरला.

दीपावली संध्या हा कार्यक्रम आमदार प्रशांत ठाकूर यांच्या संकल्पेनेतून आणि कळंबोली मंडळ अध्यक्ष अमर अरुण पाटील यांच्या नेतृताखाली संपन्न झाला. कळंबोली, सेक्टर १६, रोडपाली बस डेपो येथील मैदानावर हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. पनवेलचे कार्यक्षम आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता, ज्यात कळंबोलीतील नागरिकांनी मोठ्या संख्येने हजेरी लावली.

या दिवाळी संध्यामध्ये संगीत क्षेत्रातील नामवंत कलाकारांनी आपल्या सुमधुर गायनाने उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. राधा ही बावरीफ फेम गायक स्वप्नील बांदोडकर, गायिका गुल सक्सेना, गायक के. शिरीष आणि गायिका सपना हेमन या कलाकारांनी मराठी आणि हिंदी गीतांची अप्रतिम प्रस्तुती करत दिवाळीच्या उत्साहाला संगीताची जोड दिली.

भारतीय जनता पार्टीच्यावतीने आयोजित केलेल्या या कार्यक्रमामुळे सामान्य नागरिकांनाही दर्जेदार संगीताचा आस्वाद घेता आला. कळंबोलीच्या जनतेने या संगीतमय मदिवाळी संध्याफ्चा आनंद घेत, दिवाळीपूर्वीच सांस्कृतिक मेजवानी अनुभवली. भाजपच्या वतीने आयोजित अशा सांस्कृतिक कार्यक्रमांमुळे नागरिकांमध्ये सलोखा आणि उत्साहाचे वातावरण निर्माण होते.

या कार्यक्रमावेळी पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, माजी नगरसेवक अनिल भगत, माजी नगरसेवक बबन मुकादम, राजू शर्मा, रवी भगत, तेजस कांडपिळे, माजी नगरसेविका प्रमिला पाटील,कामोठे मंडळ अध्यक्ष विकास भगत, सांस्कृतिक सेल जिल्हा अध्यक्ष अभिषेक पटवर्धन, चिन्मय समेळ, जिल्ह उपाध्यक्ष मयुरेश नेतकर, जिल्हा चिटणीस रवी पाटील, महिला मोर्चा जिल्हा अध्यक्षा प्रिया मुकादम, भटके विमुक्त आघाडीचे जिल्हाध्यक्ष बबन बारगजे, सरचिटणीस दिलिप बिष्ट, मंडळ चिटणीस बायजा बारगजे, महिला मोर्चा अध्यक्षा मोनिका महानवर, महिला मोर्चा सरचिटणीस सरस्वती कथारा, दुर्गा सहानी, अपर्णा सरोज, युवा मोर्चा अध्यक्ष गौरव नाईक, युवा मोर्चा सरचिटणीस निशाण गिल, माजी जिल्हा सहकार सेल अध्यक्ष अशोक मोटे, उपाध्यक्ष विनोद बोरसे, मनोरंजनसिंह, सचिव विलास किते, निलेश भोईर, केशव यादव, गुरुनाथ ठाकूर,अमर ठाकूर, दर्शन पाटील, प्रभाग अध्यक्ष राम महानवर, प्रकाश शेलार, घनश्याम शर्मा, विष्णू गायकवाड, संजीत सिंह, मनीष तिवारी, राम पांडे, संजय दोडके, शुभांगी निर्मले, माजी नगरसेवक मनोहर म्हात्रे, माजी नगरसेविका दर्शना भोईर, भाजप महिला मोर्चाच्या नवीन पनवेल मंडळ अध्यक्षा राजश्री वावेकर, यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

## 'दिवाळी पहाट'ने उरणकर सुखावले

**उरण : वार्ताहर**

महेश बालदी मित्र मंडळ वतीने दीपोत्सव उरणचा जल्लोष आनंदाचा दिवाळी पहाट कार्यक्रम सोमवार (दि.२०) ऑक्टोबर रोजी सकाळी ६ वाजता उरण नगरपरिषद चेविमला तलाव येथे मोठ्या उत्साहात झाला

संगीत, संस्कृति आणि सणांची सुंदर सांगड अनुभवायला मिळाली. पहाटेच्या सुरेल मैफलीत समस्त उरणकर मंत्रमुग्ध झाले. या दीपावलीच्या शुभ दिनी उरणकरांनासंगीताची बहारदार मेजवानी मिळाली.

या कार्यक्रमात गायक गणेशबुवा गोंधळी (वावंजे), गायिका संध्या घाडगे (पनवेल), गायिका स्नेहल पाटील (पारगाव) आदि कलाकारांनी गाणी सदर केली, तर धीरेंद्र ठाकूर यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे आमदार महेश बालदी, पनवेलचे उद्योजक जे.एम. म्हात्रे, उद्योजक सदानंद गायकवाड, नीता महेश बालदी, महाराष्ट्र परिषद सदस्य रवी भोईर, माजी नगरसेवक तथा उरण शहर भाजप अध्यक्ष कौशिक शाह, माजी नगराध्यक्ष सायली म्हात्रे, उरण शहर युवा अध्यक्ष निलेश पाटील, माजी नगरसेवक राजेश ठाकूर माजी नगरसेविका प्रियांका पाटील, हितेश शाह, हस्तीमल मेहता, मनन पटेल, मनोहर सहतिया, अजित भिंडे, मकरंद पोतदार, उरण तालुका भाजप सरचिटणीस सुनील पाटील, चाणजे विभाग अध्यक्ष जितेंद्र घरत,रवी कुळकर्णी, निखिल माळी, ,कुणाल शिसोदिया, संतोष ओटवकर, सचिन वैद्य, मकरंद पोतदार, दिनेश ठक्कर, दिनेश पाटील, रमेश म्हात्रे, महेश घरत, जगदीशपाटील, गणेश पाटील, महेश बालदी मित्र मंडळ सदस्य,उरण शहरातील जेष्ठ नागरिक, मान्यवर,उरण ग्रामस्थ आदी मान्यवर उपस्थित होते. सर्वांनी आनंद व्यक्त केला.





## पनवेल शहरात भव्य दीपोत्सव सोहळा



**पनवेल :** शहरात दिवाळीच्या पार्श्वभूमीवर उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून या निमित्ताने भव्य दिपोत्सवाचा सोहळा मोठ्या जल्लोषात पार पडला. हा कार्यक्रम पनवेल महानगरपालिका तसेच श्री रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ यांच्या माध्यमातून आयोजित करण्यात आला होता.

भाजप युवा मोर्च्याच्या वतीने आयोजित केलेल्या हॅप्पी स्ट्रीटच्या माध्यमातून संपूर्ण परिसर दिव्यांच्या झगमगाटानेउजळून गेला. या सोहळ्याला आमदार प्रशांत ठाकूर, जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, माजी विरोधी पक्ष नेते प्रीतम म्हात्रे, पनवेल शहरध्यक्ष सुमित झुंजारराव, माजी नगरसेवक अनिल भगत,मनोहर म्हात्रे, अजय बहिरा, माजी नगरसेविका दर्शना भोईर, प्रीती जॉर्ज, भाजप महिला मोर्च्याच्या नवीन पनवेल मंडळ अध्यक्षा राजश्री वावेकर, अमित ओझे, रुपेश नागवेकर, प्रभाकर बहिरा, केदार भगत, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष आनंद ढवळे,प्रवीण मोरबाळे, प्रशांत शेट्टे, महेश राऊळ यांच्यासह पदाधीकारी, कार्यकर्ते, नागरिक उपस्थित होते.





**पनवेल : दीपावलीनिमित्त भाजप गव्हाण जिल्हा परिषद अध्यक्ष निलेश खारकर आणि निकिता खारकर यांनी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची सदिच्छा भेट घेऊन आशीर्वाद घेतले. सोबत धीरज ओवळेकर, शैलेश भगत, सुहास गोंधळी, दीपक गोंधळी, प्रतिश पाटील, विजय घरत, अमर म्हात्रे, किशोर पाटील, संतोष पाटील आदी कार्यकर्ते उपस्थित होते.**

## फडके विद्यालयात पर्यावरणपूरक किल्ले बांधणी स्पर्धा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नवीन पनवेल येथील म. ए. सो. आद्यक्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके विद्यालयात दिवाळी सुट्ट्यांच्या स्वागतार्थ आयोजित पर्यावरणपूरक किल्ले बांधणी स्पर्धा मोठ्या उत्साहात पार पडली.

या उपक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे इयत्ता तिसरी आणि चौथीच्या विद्यार्थ्यांनी तब्बल १२ गटांमध्ये विभागून दोन दिवस १५ व १६ ऑक्टोबर रोजी विविध ऐतिहासिक किल्ल्यांच्या प्रतिकृती साकारल्या. या स्पर्धेत युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत समाविष्ट १२ किल्ल्यांचे अचूक व कलात्मक पुनर्रचनाद्वारे विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पकतेचा आणि देशभक्तीचा सुंदर संगम घडवला. विद्यार्थ्यांनी दोन



दिवस परिश्रम घेऊन माती, कागद, कापूस, गवत यांसारख्या पर्यावरणपूरक साहित्यांचा वापर करून अतिशय सुंदर किल्ल्यांची उभारणी केली. या प्रक्रियेत पालक आणि शिक्षक वर्गाचे मार्गदर्शनही त्यांना लाभले.

कार्यक्रमाच्या बक्षीस वितरण सोहळ्यात कोकण इतिहास परिषद व शिवशंभू विचार मंच (ठाणे विभाग) चे संयोजक पंकजजी भोसले यांच्या हस्ते विजेत्या गटांना स्मृतीचिन्ह व प्रशस्तीपत्र प्रदान करण्यात आले. तसेच या प्रसंगी शिवशंभू विचार मंचाचे सभासद श्री. पटवर्धन, महाराष्ट्र संशोधन व उन्नती प्रशिक्षण प्रबोधिनी – अमृत दुर्गोत्सव उपक्रमाचे रायगड जिल्हा व्यवस्थापक श्री. शैलेश मराठे, तसेच करंजाडे येथील उद्योजक व वैदेही एंटरप्रायझेसचे संचालक श्री. विक्रम मोरे उपस्थित होते.

याप्रसंगी मान्यवर म्हणाले,छत्रपती शिवाजी महाराजांनी किल्ल्यांच्या बळावर स्वराज्याची निर्मिती केली. किल्ला म्हणजे केवळ मातीचा ढिगारा नसून, तो आपल्या इतिहासाचा, शौर्याचा आणि अभिमानाचा प्रतीक आहे. लहानगे विद्यार्थी जेव्हा स्वतः किल्ला बांधतात, तेव्हा ते नकळत इतिहासाशी जोडले जातात. त्यामुळे केवळ करमणूक न ठेवता महाराजांचा गौरवशाली वारसाही जगतात यातून खरे शिक्षण घडते.या उपक्रमाने विद्यार्थ्यांमध्ये इतिहासाची जाण, समूहभावना, कल्पकता, सर्जनशीलता आणि पर्यावरणपूरक दृष्टीकोन रुजवण्याचे उद्दिष्ट यशस्वीरीत्या साध्य केले.



## संपादकीय

# वायुप्रदूषणाकडे लक्ष हवे

मुंबई व आसपासच्या परिसरात पावसाळ्यापाठोपाठ वायुप्रदूषणाचे प्रमाण वाढणे हे गेली काही वर्षे नियमितपणे दिसते आहे. पावसाळ्यानंतर वाऱ्यांची स्थिती बदलली की हवेत साचलेली धूळ, प्रदूषके यांचा निचरा होत नाही. नेहमीच्या कारणांमध्ये दिवाळीच्या फटाक्यांमुळे होणाऱ्या प्रदूषणाचीही भर पडते व विशेषत: लहान मुले व वृद्धांना या वाढलेल्या प्रदूषणाचा अधिक त्रास होतो.

**पावसाळ्यानंतर वाऱ्यांची बदललेली स्थिती, हवेतील आर्द्रता, पायाभूत सुविधा प्रकल्प तसेच निवासी व व्यावसायिक बांधकामे यांच्या खोदकामामुळे वाढणारी धूळ या साऱ्या कारणांमध्ये दिवाळीच्या काळात फटाक्यांच्या आतषबाजीमुळे होणाऱ्या प्रदूषणाचीही भर पडते. फुफ्फुसांचे विकार असणाऱ्या व्यक्ती, लहान मुले व वयोवृद्धांना वाढलेल्या वायुप्रदूषणाचा प्रचंड त्रास होतो. त्यामुळेच या समस्येविषयी सजग राहून वेळीच उपाययोजना करून वायुप्रदूषण भयावह पातळी गाठणार नाही याची काळजी घ्यावी लागते. या दृष्टीनेच काही वर्षांपूर्वी राज्य सरकारने मुंबई महानगरात प्रदूषण नियंत्रणासाठी हवाई निरीक्षण केंद्रे स्थापन करण्याचा निर्णय घेतला होता. शहरातील धूळ कमी करण्यासाठीही सातत्याने उपाययोजना केली जाते. तूर्तास निव्वळ मुंबईच नव्हे तर पुणे, नागपूरसह राज्यातील इतरही काही प्रमुख शहरांच्या हवेची गुणवत्ता खालावलेली दिसते आहे. पुण्यासोबत पिंपरी-चिंचवडमध्येही हवेची गुणवत्ता अतिखराब नोंदवण्यात आली आहे. नागपूर शहरातील हवेचा गुणवत्ता निर्देशांक एरव्ही शंभरच्याही आत असतो. परंतु रविवारी तो २००च्या वर नोंदला गेला. पावसाळ्यानंतर वाऱ्यांची स्थिती बदलली की बाष्पामुळे धुलीकण हवेतच तरंगत राहतात. गेली काही वर्षे देशाची राजधानी असलेल्या दिल्ली शहरातील वायुप्रदूषण भयावह पातळी गाठत असल्याचे दिसते. तेथे आसपासच्या ग्रामीण भागांत शेतांमध्ये पालापाचोळा जाळला जाऊ लागला की हिवाळ्यात वायुप्रदूषण वाढते. तशी परिस्थिती देशातील अन्य शहरांमध्ये ओढवू नये यादृष्टीने देशभरात वायुप्रदूषण नियंत्रणाचे प्रयत्न सुरू आहेत. हवेचा दर्जा सुधारला पाहिजे आणि नागरिकांना शुद्ध हवा मिळाली पाहिजे अशीच सरकारची भूमिका आहे. त्यामुळेच दक्षतेने राज्यभरात शहरांमधून हवेची गुणवत्ता तपासली जाते. याच दृष्टीने सरकार इलेक्ट्रिक वाहनांना प्रोत्साहन देते. तसेच वाहतूक सिग्नल सुव्यवस्थित करूनही प्रदूषण नियंत्रणाचा प्रयत्न होतो. अनेक मानवनिर्मित कारणांमुळे शहरांमधील प्रदूषणांत भर पडते. पायाभूत सुविधा प्रकल्पांसाठी होणारे खोदकाम, निवासी व व्यावसायिक संकुलांचे बांधकाम या साऱ्यांमुळे मोठ्या प्रमाणात धूळ उडत असून त्यामुळेही शहरातील हवेचा दर्जा ढासळतो. प्रत्येक नागरिकाने रस्त्यावरील वाहनांची संख्या मर्यादित ठेवण्यास हातभार लावला तर प्रदूषण नियंत्रणास नक्कीच मदत होऊ शकेल. वाहनांच्या धुरात अतिसूक्ष्म काजळीसारखे कण असतात. यांचे प्रमाण वाढल्यासही शहरे धुरकट होतात. नैर्ऋत्य मान्सूनच्या काळात समुद्रावरून येणारे वारे माघारी फिरले की मुंबईच्या प्रदूषणात वाढ होण्यास सुरुवात होते. पावसाळ्यात समुद्रावरून येणाऱ्या वाऱ्यांमुळे प्रदूषके वाहून नेली जातात. पावसाळा संपला की समुद्रावरून येणारे वारेही उशीराने येत असल्यामुळे प्रदूषके हवेत तशीच साचून राहतात. याच कारणामुळे सध्या मुंबईच्या हवेचा गुणवत्ता निर्देशांक बाधित झालेला दिसतो आहे. रविवारी मुंबईत हा निर्देशांक १५५ इतका नोंदला गेला. ऑक्टोबर महिन्यातील हा सर्वाधिक निर्देशांक आहे. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मते मुंबईच्या हवेची गुणवत्ता खालावण्यासाठी ओझोनची पातळी सर्वाधिक जबाबदार आहे. सर्व स्तरांवरून दक्ष राहून खबरदारी घेतली गेल्यास वायुप्रदूषण नियंत्रित राहण्यास नक्कीच मदत होऊ शकेल.**

# लक्ष्मीपूजनाची परंपरा आणि महत्त्व

पाच दिवसांच्या उत्सवातील सर्वात महत्त्वाचा दिवस म्हणजे लक्ष्मीपूजन. अश्विन अमावस्येला (या वर्षी, २१ ऑक्टोबर, मंगळवार) लक्ष्मीपूजन मोठ्या उत्साहाने साजरे केले जाते. या दिवशी स्थिर धन-संपत्तीची देवी माता लक्ष्मी, गणेश (बुद्धी आणि शुभ-लाभासाठी) आणि कुबेर (धनाचे रक्षण करणारे देव) यांची विधीवत पूजा केली जाते. या पूजेमागे अशी श्रद्धा आहे की, या रात्री माता लक्ष्मी पृथ्वीवर संचार करते आणि जे भक्त स्वच्छ घरात तिचे स्वागत करतात, त्यांच्या घरी ती दीर्घकाळ वास करते.

लक्ष्मीपूजनाचा मुख्य उद्देश घरात धन, समृद्धी आणि ऐश्वर्य कायम राहावे हा असतो. या पूजेने केवळ पैसाच नाही, तर आरोग्य, यश आणि मानसिक शांतीदेखील प्राप्त होते. लक्ष्मीपूजनाच्या रात्री घरात तेलाचे, तुपाचे दिवे लावले जातात, जे अंधारावर प्रकाशाचा विजय दर्शवतात. या प्रकाशात माता लक्ष्मी सहजपणे घरात प्रवेश करते.

आश्विन अमावास्येला लक्ष्मीपूजन येते. या दिवशी प्रात:काळी मंगलस्नान करून देवपूजा करावी. प्रदोषकाळी फुलांनी सुशोभित केलेल्या मंडपात लक्ष्मी, विष्णू इत्यादी देवता आणि कुबेर यांची पूजा करावी. यादिवशी घर-गोठा स्वच्छ करून घरात गोमुत्र शिपंडून घर पवित्र करतात. व्यापारी लोक त्यांच्या वह्या-चोपड्यांची पूजा करतात. या दिवसानंतरच व्यापारांचे नवीन आर्थिक वर्ष सुरू होते. बाजारात लक्ष्मीच्या मूर्ती मिळतात, त्यांना घरी आणून त्यांची पूजा करण्याचीदेखील पद्धत आहे.

लक्ष्मीपूजनाच्या दिवशी विष्णूने लक्ष्मीसह सर्व देवांना बळीच्या कारागृहातून मुक्त केले आणि त्यानंतर ते सर्व देव क्षीरसागरात जाऊन झोपले, अशी कथा आहे. त्या प्रित्यर्थ प्रत्येकाने त्यांच्या स्वत:च्या घरी सर्व सुखोपभोगांची उत्तम व्यवस्था करावी आणि सर्वत्र दिवे लावावे असे सांगितले जाते. याच दिवशी प्रभू रामचंद सीतामाईला घेऊन आयोध्येत आले होते. याच दिवशी भगवान श्रीकृष्णाने समाधी घेतली. याच दिवशी भगवान महावीरांना निर्वाण प्राप्त झाले आणि याच दिवशी संध्याकाळी महावीरांचे प्रमुख शिष्य गौतम गणधर यांना कैवल्य ज्ञान प्राप्त झाले.

अश्विन वद्य अमावस्या म्हणजे लक्ष्मीपूजनाचा दिवस. दिवाळीत



लक्ष्मीपूजनाच्या दिवशी सूर्य आपल्या दुसऱ्या चरणात प्रवेश करतो. अमावस्या असूनही या दिवसाला अतिशय शुभ मानले जाते हे विशेष आहे. घरामध्ये सुखशांती आणि धनाची देवी महालक्ष्मीचा आशीर्वाद कायम राहावा यासाठी लक्ष्मीपूजन केले जाते. लक्ष्मी ही फार चंचल असते असा समज आहे. त्यामुळे, शक्यतो हिंदू शास्त्राप्रमाणे लक्ष्मीपूजन हे, लक्ष्मी स्थिर रहावी, म्हणून ज्योतिषशास्त्रानुसार स्थिर लग्न मुहूर्तावर करतात.

दिवाळीसाठी पूर्वी जमिनीवर प्रथेप्रमाणे तांदळाच्या ओल्या पिठाची रांगोळी काढतात. त्याला 'मांडणे' असे म्हणतात. त्यावर पाट मांडून लक्ष्मीपूजन किंवा ओवाळणे आदी विधी केले जातात. एका लाकडी पाटावर गुलाबाच्या पाकळ्या ठेवून अक्षतांचे स्वस्तिक काढावे. त्यावरच श्री लक्ष्मी आणि श्री कुबेराची मूर्ती याची मनोभावे पूजा करावी. लाह्या बत्ताशांचा नैवेद्य दाखवावा, श्री सूक्ताचे पाठ करावे. योग्य मुहूर्तावर लक्ष्मीपूजन केल्यास ते लाभदायक ठरते असे म्हटले जाते.

लक्ष्मीपूजनाच्या दिवशी अलक्ष्मीला बाहेरचा रस्ता दाखवला जातो. अलक्ष्मी ही अशुभाची, दुर्भाग्याची, अपयशाची देवता मानतात. पद्मपुराणात अलक्ष्मीच्या जन्माची कथा वर्णन करण्यात आली आहे. अलक्ष्मीचे वाहन गाढव तर हातात झाडू हे आयुध होते. ती अलक्ष्मी घरात येऊ नये म्हणून लक्ष्मीपूजनाच्या दिवशी झाडूची पूजा करण्याची प्रथा पडली आहे. मध्यरात्रीनंतर सुप आणि दिमडी वाजवून अलक्ष्मीला हाकलून देण्याची प्रथा आहे.

असेही म्हणतात की, अश्विन अमावस्येला सूक्ष्म स्वरूपात गतिमान होणारी त्रासदायक स्पंदने जागृत होतात आणि सर्व वायूमंडला जावून बसतात. त्यांना बाहेर काढण्यासाठी घरात केर, कचरा काढला जातो, की जेणी करून वायू मंडळात गतिमान असणारे त्रासदायक घटक बाहेर फेकली जातील. घराचे पावित्र्य टिकून रहावे म्हणून आश्विन अमावास्येच्या रात्री अलक्ष्मी निस्सारण म्हणजेच रात्री बारा वाजता घरात केर काढतात. अजून एक महत्वाची गोष्ट लक्ष्मी पूजनाच्या दिवशी केली जाते, ती म्हणजे नव्या झाडूची खरेदी. झाडूला साक्षात लक्ष्मी मानून, तिच्यावर पाणी शिंपडून, तिला सवाष्ण लक्ष्मी मानून तिची हळद-कुंकू वाहून मनोभावे पूजा करतात आणि नंतरच घरात वापरण्यास सुरुवात होते.

प्रत्येक राज्यात लक्ष्मीपूजनाची एक वेगळी पद्धत असते त्यापैकी आंध्रप्रदेशातील लोक लक्ष्मीपूजनाच्या दिवशी घरासमोर एक मचाण बांधून त्यावर पणत्या लावतात. महिला रात्रभर मचाणात बसून पणतीच्या प्रकाशात लक्ष्मीच्या स्वागताची गाणी गातात. त्या दिवशी रेड्यांच्या टकरी लावल्या जातात. आश्विन अमावास्येला केलेले पितृतर्पण विशेष फलप्रद मानले जाते.

लक्ष्मीपूजनाच्या दिवशी गणपती, माता लक्ष्मी आणि सरस्वती यांची प्रतिमा असलेल्या फोटोचीसुद्धा पूजा केली जाते. असे सांगतात की, आश्विन अमावास्येच्या रात्री लक्ष्मी सर्वत्र संचार करते आणि आपल्या निवासासाठी योग्य असे स्थान शोधू लागते. जेथे चारित्र्यवान, कर्तव्यदक्ष, संयमी, धर्मनिष्ठ, देवभक्त आणि क्षमाशील पुरुष आणि गुणवती आणि पतिव्रता स्त्रिया असतात, त्या घरी वास्तव्य करणे लक्ष्मीला आवडते. जिथे स्वच्छता आणि सकारात्मकता आहे तिथे लक्ष्मीचे वास्तव्य असते.

लक्ष्मीपूजनासाठी सर्वात शुभ वेळ प्रदोष काळ (सूर्यास्तानंतरचा काळ) आणि वृषभ काल (स्थिर लक्ष्मीचा काळ) मानला जातो. २१ ऑक्टोबर, मंगळवार रोजी सायंकाळी ५.३२ वाजल्यापासून ते रात्री ८.१६ वाजेपर्यंत (वेळेत स्थानिक पंचांगानुसार थोडा बदल असू शकतो) हा पूजेसाठी उत्तम शुभमुहूर्त आहे. याच काळात विधिवत पूजा केल्यास लक्ष्मीची स्थिर कृपा प्राप्त होते.

लक्ष्मीपूजनाच्या तयारीसाठी अनेक वस्तूंची आवश्यकता असते. पूजेसाठी लागणारे मुख्य साहित्य म्हणजे लक्ष्मी आणि गणेशाची मूर्ती, पूजेसाठी पाट (चौरंग), लाल किंवा पिवळे वस्त्र, तांब्याचा कलश, अक्षता, हळद-कुंकू, गंगाजल, जानवे, पंचामृत, धूप-दीप आणि कापूर. नैवेद्यासाठी दूध-साखरेचा प्रसाद आणि फळे लागतील. यासोबतच कमळ, गुलाब, बेलपत्र, श्रीफळ नारळ), नवीन नाणी (रुपये), सोन्याची किंवा चांदीची वस्तू, तसेच हळदीची गाठ आणि आंब्याची पाने पूजेत अवश्य वापरावीत.

लक्ष्मीपूजनाची विधिवत
पूजा खालीलप्रमाणे करावी

स्वच्छता आणि स्थापना : पूजेच्या जागेची पूर्ण स्वच्छता करून त्यावर पाट (चौरंग) ठेवा आणि त्यावर लाल वस्त्र पसरावे. पाटावर तांदळाचे छोटे आसन (रास) तयार करून त्यावर लक्ष्मी आणि गणेशाची मूर्ती स्थापित करावी.

कलश स्थापना आणि दीप प्रज्वलन : मूर्तीजवळ पाण्याने भरलेला तांब्याचा कलश ठेवा. तुपाचा दिवा (उदा. तिन्हीसांजेचा दिवा) लावा आणि 'दीप' हे साक्षात् विष्णूंचे स्वरूप आहे, या भावनेने त्यांना आवाहन करून पूजेला सुरुवात करा.

संकल्प आणि गणेश पूजा : उजव्या हातात पाणी घेऊन पूजेचा संकल्प करावा. त्यानंतर प्रथम भगवान गणेशाची पूजा करावी, त्यांना दुर्वा आणि मोदक किंवा मिठाई अर्पण करावेत. तयार केलेला फराळ अर्पण करावा.

लक्ष्मी पूजा आणि मंत्र : आता माता लक्ष्मीची विधिवत पूजा सुरू करावी. त्यांना हळद-कुंकू, अक्षता, कमळाचे फूल आणि कमलगट्टा अर्पण करावा. यानंतर 'ॐ महालक्ष्म्यै नमः' किंवा 'ॐ श्रीं ह्रीं श्रीं कमले कमलालये प्रसीद प्रसीद श्रीं ह्रीं श्रीं ॐ महालक्ष्म्यै नमः' या मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

नैवेद्य आणि आरती : तयार केलेला नैवेद्य माता लक्ष्मीला अर्पण करावा. मूर्तीसमोर पैसा, दागिने, नवीन वस्तू ठेवाव्यात. शेवटी, लक्ष्मीची आणि गणपतीची आरती करून सर्वांना प्रसाद वाटावा आणि देवघरात नंदादीप आणि घरात पणत्यांची रोषणाई करावी. (साभार : इंटरनेट)



## बदलते तंत्रज्ञान

# ई-कॉमर्स प्लॅटफॉर्मवर उत्तम ऑफर्स उपलब्ध

सर्वत्र धनत्रयोदशीचा उत्सव साजरा केला जात आहे. धनत्रयोदशीनिमित्त लोक सोनं खरेदी करतात. आता




वेगवेगळ्या प्लॅटफॉर्मवर सुरू असलेल्या ऑफर्सबद्दल माहिती देण्यात आली आहे. ज्यामुळे तुम्हाला सोन्याची शुद्धता आणि किमतींची तुलना करून खरेदी करण्याचा निर्णय घेता येईल. आम्ही तुम्हाला १७ ऑक्टोबर रोजी दोन ई-कॉमर्स प्लॅटफॉर्म आणि ज्वेलरी ब्रँडमधील सोन्याच्या नाण्यांच्या किमतींची तुलना येथे सांगणार आहे.

ॲमेझॉनवर MMTC-PAMPचा 24K (९९९.९) ८-ग्रॅम सोन्याचे नाणं १,१६,६३० रुपयांना खरेदीसाठी उपलब्ध आहे. तर कल्याण ज्वेलर्ससारख्या ठिकाणी 24K (९९९.९) १०-ग्रॅम सोन्याचे नाणं १,४१,०१४ रुपयांना खरेदीसाठी उपलब्ध आहे. यामध्ये Amazon RBL बँक क्रेडिट कार्ड वापरून केलेल्या पेमेंटवर ५% त्वरित सूट (जास्तीत जास्त १,०००) समाविष्ट आहे.

फ्लिपकार्ट वर MMTC-PAMP चा 24K (९९९.९) ८-ग्रॅम सोन्याचा सिक्का १,१४,४८० रुपयांना खरेदीसाठी उपलब्ध आहे. तर PC ज्वेलर्ससारख्या ठिकाणी 24K (९९५) १०-ग्रॅम सोन्याचे नाणं १,४०,४९२ रुपयांना खरेदीसाठी उपलब्ध आहे. फ्लिपकार्ट SBI क्रेडिट कार्डद्वारे पेमेंट केल्यास ७५० रुपयांचे डिस्काऊंट ऑफर करत आहे.

टाटा क्लिक फॅशनवर मुथूट पप्पचन स्वर्णवर्षमचा २४घ (९९९) १०-ग्रॅम सोन्याचे नाणं १,३८,७४३ रुपयांना खरेदीसाठी उपलब्ध आहे. BOBC-RD आणि एक्सिस बँक क्रेडिट कार्ड्सचा वापर करून ग्राहक त्यांच्या खरेदीवर १५ टक्क्यांपर्यंत डिस्काऊंट मिळवू शकतात. दुसरा पर्याय म्हणजे कल्याण ज्वेलर्सचा त्याच शुद्धतेचा १० ग्रॅम सोन्याचा नाणे १,३९,५६४ रुपयांमध्ये उपलब्ध आहे, ज्यामध्ये कोणत्याही अतिरिक्त ऑफर्स नाहीत.


अजियोवर MMTC-PAMP चा 24K (९९९.९) १०-ग्रॅम सोन्याचे नाणे १,४२,८७३ रुपयांना खरेदीसाठी उपलब्ध आहे. दुसरा पर्याय म्हणजे पीएन गाडगीळ ज्वेलर्सकडून १,३७,४३७ रुपयांमध्ये २४घ (९९५) १० ग्रॅमचे नाणे खरेदी केले जाऊ शकते. सर्व ब्रँड DHANVARSH-2 कोड वापरून ९,९९९ रुपये आणि त्याहून अधिक किमतीच्या कार्ट किमतीवर अतिरिक्त २% सूट (२,००० पर्यंत) देत आहेत.

# गायक व संगीतकार राम फाटक

रामचंद्र कृष्णाजी फाटक ऊर्फ राम फाटक हे मराठी गायक, संगीतकार होते. आज त्यांचा जन्मदिन (२१ ऑक्टोबर १९१७) आहे. त्यानिमित्त जाणून घेऊया त्यांच्याविषयी या लेखातून..

रामभाऊंचे क्रमिक विद्याशिक्षण चालू असतानाच त्यांनी पुण्यात राहून ग्वाल्हेर गायकीचे धडे घेतले. बालगंधर्वांनी नाटक कंपनीत येण्याचे निमंत्रण देऊनही शिक्षणाच्या कारणासाठी त्यांनी नकार दिला. नोकरी करत असतानाही त्यांची संगीताची ओढ कमी झाली नव्हती. १९४५मध्ये एचएमव्हीने त्यांची पहिली ध्वनिमुद्रिका प्रकाशित केली आणि रामभाऊंना आपले सुखनिधान सापडले.

शिक्षणाने एम.ए., बी.टी. असलेल्या राम फाटकांनी काही वर्षे शिक्षकी पेशा पत्करला. पुढे इ.स. १९५६पासून पुढील १० वर्षे नागपूर आकाशवाणी केंद्रावर तर त्यापुढील १० वर्षे पुणे आकाशवाणीवर त्यांनी नोकरी केली. इथेच भास्करराव गोडबोले आणि जे.एल. रानडे ह्यांसारख्यांचे मार्गदर्शन त्यांना मिळाले. पुणे आकाशवाणी केंद्रावर असतानाच ज्येष्ठ गायक आणि संगीतकार सुधीर फडके ह्यांच्याशी त्यांचा स्नेह जुळला. सुधीर फडक्यांच्या गीतरामायणामधील काही गाणी ते गायले. आकाशवाणीच्या पुणे केंद्रासाठी त्यांनी



## निमित्त

शास्त्रीय संगीत गायिका बेगम परवीन सुलताना यांच्याकडून काही मराठी भावगीते गाऊन घेतली.

इ.स. १९७२ साली त्यावेळचे नवोदित गीतकार सुधीर मोघे ह्यांच्या 'सखी मंद झाल्या तारका' ह्या गीताला राम फाटकांनी स्वरबद्ध करून भीमसेन जोशी ह्यांच्याकडून हे गाणे गाऊन घेतले. पुढे हे गाणे ध्वनीफितीद्वारे सुधीर फडक्यांच्या स्वरात प्रकाशित करण्यात आले.

रामभाऊंनी 'संतवाणी'मधील 'तीर्थ विठ्ठल', 'माझे माहेर पंढरी', 'पंढरी निवासा', 'अणुरेणीया थोकडा' हे पंडित भीमसेन जोशींकडून गाऊन घेतलेले अभंग खूपच लोकप्रिय झाले. ह्याबरोबरच 'दिसलीस तू', 'डाव भांडून मांडून मोडू नको' आणि 'सखी, मंद झाल्या तारका' ही सुधीर फडक्यांनी गायलेली भावगीते प्रचंड गाजली. रामभाऊ फाटक यांनी 'स्वरयात्रा' या नावाचे आत्मचरित्र लिहिले आहे.

**राम फाटक यांचे संगीत असलेली काही गाणी**

अणुरेणिया थोकडा, अंतरीच्या गूढ गर्भी, अधिक देखणें तरी, अबीर गुलाल उधळीत, आता कोठे धावे मन, आम्हां नकळे ज्ञान, आरंभी वंदीन अयोध्येचा, ऊर्मिले त्रिवार वंदन तुला, काया ही पंढरी आत्मा, घडी घडी घडी चरण तुझे, जातां पंढरीस सुख वाटे, ज्याचा सखा हरी, झुंजता रणभूवरी तू, डाव मांडून भांडून, तपत्या झळा उन्हाच्या, तीर्थ विठ्ठल क्षेत्र विठ्ठल, दिसलीस तू फुलले ऋतू, नामाचा गजर गर्जे, पावलों पंढरी वैकुंठभुवन, पुण्य परउपकार पाप ते, पंढरी निवासा सख्या, पंढरीचे सुख नाहीं, पांडुरंग त्राता पांडुरंग दाता, मन लोभले मनमोहने, माझा भाव तुझे चरणी, माझे माहेर पंढरी, रसिका तुझ्याचसाठी, राम नाम ज्याचें मुखी, रामाचें भजन तेंचि, विठ्ठल गीतीं गावा, सखी मंद झाल्या तारका, सगुणाची सेज निर्गुणाची, सुखाचें हें नाम आवडीनें, संतभार पंढरीत, हे नायका जगदीश्वरा, ज्ञानियांचा राजा.

(साभार : इंटरनेट)

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# सकाळी उठल्यावर होणाऱ्या सांधेदुखीपासून बचावाचे उपाय

सकाळी उठल्यावर गुडघे दुखतात, हात वळवताना हाडांचा आवाज येतो, किंवा जिने चढताना पाय कडक होतात? असं काही होत असेल, तर हे दुर्लक्षित करू नका. हेच आर्थ्रायटिसचे सुरुवातीचे लक्षण असू शकतं.

आज, १२ ऑक्टोबर रोजी संपूर्ण जगभरात 'वर्ल्ड आर्थ्रायटिस डे' म्हणजेच 'जागतिक संधिवात दिवस' साजरा केला जातो. याचा उद्देश म्हणजे लोकांमध्ये सांधेदुखी (आर्थ्रायटिस) या वाढत्या विकाराबद्दल जागरूकता निर्माण करणे. सांधे म्हणजे शरीराच्या हालचालींचा आधार, त्यामुळे त्यांचं आरोग्य चांगलं राहणं अत्यंत आवश्यक आहे.



सांधेदुखीची सामान्य लक्षणे

सकाळी उठल्यावर सांधे कडकणे किंवा दुखणे. चालताना, जिने चढताना किंवा बसताना त्रास होणे. सांध्यांत सूज किंवा ताण जाणवणे. हात वळवताना किरकिर आवाज येणे. सतत थकवा किंवा अंगदुखी जाणवणे

सांधेदुखी कमी करण्यासाठी उपयुक्त सवयी

१. नियमित व्यायाम

रोज चालणे, स्ट्रेचिंग, योगासने किंवा हलका व्यायाम करा. यामुळे रक्ताभिसरण सुधारते, सांधे लवचिक राहतात आणि वेदना कमी होतात.

२. हळदीचा काढा किंवा दूध

हळदीतील कर्क्युमिन घटक नैसर्गिकरीत्या सूज कमी करतो. रात्री हळदीचे दूध किंवा आठवड्यात काही वेळा हळदीचा काढा घेणे फायदेशीर ठरते.

३. वजन नियंत्रण

जास्त वजनामुळे गुडघे आणि कंबर यांवर ताण येतो. योग्य वजन ठेवल्यास सांधे मजबूत राहतात.

४. पुरेशी झोप आणि ताणमुक्त जीवनशैली

झोप कमी किंवा ताण अधिक असल्यास शरीरात सूज निर्माण करणारे हार्मोन्स वाढतात. ध्यान, प्राणायाम आणि विश्रांतीसाठी वेळ देणे आवश्यक आहे.

जर सतत सांध्यांमध्ये वेदना, सूज किंवा हालचालींमध्ये अडथळा जाणवत असेल, तर वेळ न दवडता ऑर्थोपेडिक तज्ज्ञांचा सल्ला घ्या. वेळेत निदान आणि योग्य उपचारामुळे पुढील गुंतागुंत टाळता येते.

(या माहितीमध्ये दिलेले आरोग्यविषयक सल्ले सामान्य माहितीवर आधारित आहेत.)

# रोहा भुवनेश्वरमध्ये मोकाट गुरांचा त्रास; ग्रामस्थांची प्रशासनाकडे बंदोबस्ताची मागणी

**रोहा : प्रतिनिधी**

रोहा शहरात आणि भुवनेश्वर परिसरात सध्या उनाड गुरांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढली असून नागरिकांना विशेषतः रात्रीच्या वेळी मोठा त्रास सहन करावा लागत आहे. रात्रीच्या वेळी ही गुरे रस्त्यावर ठाण मांडून बसतात, त्यामुळे वाहनधारकांना अडचणी येत आहेत. अनेक वेळा अपघातांची शक्यता निर्माण होते.



गुरांचा मुक्काम अनेकदा रोहा शहरातील व शहरानजीक असलेल्या भुवनेश्वर येथील मुख्य रस्त्यावर असल्याचे दिसून येते. रोहा शहरातील रोहा कोलाड रोडवर यासह अंतर्गत रस्त्यावर गुरांचा मुक्काम दिसून येतो, तर दुसरीकडे भुवनेश्वर येथील कालवा रोडवर गुरांचा मुक्काम दिसून येतोकाही वेळा गुरांचा मुक्काम भुवनेश्वरमधील सोसायट्यांमध्येही दिसून येतो. त्यामुळे रहिवाशांना स्वच्छतेचा व दुर्गंधीचा त्रास भोगावा लागत आहे. गुरांचे मालक मात्र पूर्णपणे बेफिकीर असून त्यांनी या गुरांकडे लक्ष देणे सोडल्याचे दिसून येते. विशेष म्हणजे, अलीकडच्या काळात वासरांवर उनाड श्वानांकडून हल्ल्याच्या घटना वाढल्या आहेत. त्यामुळे प्राणीप्रेमींनी आणि नागरिकांनीही चिंता व्यक्त केली आहे. ग्रामस्थांनी प्रशासनाकडे उनाड गुरांचा बंदोबस्त करण्याची मागणी केली आहेम मात्र गुरांना ठेवण्यासाठी योग्य जागा नसल्याने वरसे ग्रामपंचायतीसमोर मोठा प्रश्न उभा राहिला आहे.

## खोपोलीत दारूच्या नशेत कोयत्याने वार, पाच जणांविरोधात गुन्हा दाखल

**खोपोली : प्रतिनिधी**

गैरसमजुतीतून आणि दारुच्या नशेत पाच जणांनी खोपोली पटेल नगर मध्ये राहणा-या एका इसमाला हाताबुक्क्याने आणि कोयत्याने मारहाण केल्याची घटना खोपोली पोलीस ठाणे हद्दीत शनिवारी घडली.

खोपोली पोलीस ठाणे हद्दीत दिनांक १८ ऑक्टोबर रोजी ७ वाजण्याच्या सुमारास दत्तवाडी गावचे हद्दीत मुंबई-पुणे एक्सप्रेसवेलगत चहाचे टपरीजवळ फिर्यादी रा.पटेल नगर, खोपोली, हे चहाचे टपरी जवळ येथे चहा पित असताना अनोळखी पाच आरोपीनी फिर्यादी यांचे जवळ येवुन तु आमचे कडुन भाड्याचे ६० रुपये का घेतलेस असे बोलुन फिर्यांदी हे पिकअप चालक आहेत असा गैरसमज केला. त्यांना दारुच्या नशेत शिवीगाळी केली. त्या दोन अनोळखी ईसमांपैकी एकाने आणखी तिन इसमांना बोलावुन घेतले. सर्वानी हाताबुक्याने मारहाण करुन शिवीगाळी केली तसेच त्यांच्या पैकी अंगाने बारीक उंचीने बुटका रंगाने काळा असलेल्या एका ईसमाने हातातील कोयत्याने फिर्यादी यांचे डोक्यात व उजव्या हाताचे मनगटावर घाव घालुन त्यांना गंभीररित्या जखमी केले.

याबाबत खोपोली पोलीस ठाणे येथे अनोळखी पाच आरोपी विरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास सपोनि मनोज ठाकरे हे करीत आहेत.



**पाली : राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांची भेट घेऊन दीपावलीच्या शुभेच्छा देताना पक्षाचे सुधागड तालुकाध्यक्ष संदेश शेवाळे, पाली नगरपंचायतीचे नगराध्यक्ष पराग मेहता, उपनगराध्यक्ष सुलतान बेणसेकर व इतर मंडळी.**

## फातिमा मातेची ९०वी तीर्थयात्रा उत्साहात, शेकडो भाविकांनी घेतले दर्शन

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जतमधील ख्रिश्चन धर्मियांचे प्रार्थना मंदिर (चर्च) गेल्या काही दशकांपासून फातिमा माऊलीच्या नावाने प्रसिद्ध आहे. प्रत्येक वर्षी १३ ऑक्टोबर किंवा त्या नंतर येणाऱ्या रविवारी या मातेची तीर्थयात्रा असते. यंदा फातिमा मातेची ९० वी तीर्थयात्रा उत्साहात संपन्न झाली. देश - विदेशांतून आलेल्या भाविकांनी मातेचे दर्शन घेतले. तसेच अन्य धर्मियांनी देखील उपस्थिती दर्शवून दर्शन घेतले.



कर्जत रेल्वेस्थानकानजीक असलेल्या चर्चच्या परिसरात अक्षरशः जत्रेचे स्वरूप आले होते. सकाळी फातिमा मातेच्या पुतळ्याचे पूजन करण्यात आले. सकाळी सात वाजता मराठी भाषेत, आठ वाजता कोंकणी भाषेत, नऊ वाजता मराठी भाषेत आणि दहा वाजता इंग्रजी भाषेत भाविकांसाठी प्रार्थना करण्यात आली. त्यानंतर अकरा वाजता चर्च चे प्रमुख फादर ज्यो डिमेलो यांच्या उपस्थितीत फादर ऑसवाल्ड ग्रॅसिअस यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. बँड पथकाच्या तालावर फातिमा मातेची मिरवणूक काढण्यात आली. या वेळी ख्रिश्चन धर्मियांबरोबरच अन्य धर्मीय भाविकांनीही जागोजागी मातेच्या पुतळ्यावर फुलांचा वर्षाव केला.

फादर निल डॉस सांतोस यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करतांना, 'मारिया सर्वसामान्य व्यक्ती होती, देवाने निवडलेली व्यक्ती होती. करुणायुक्त हृदय, धैर्यवान, वचनबद्ध व्यक्ती होती तिच्या जीवनाचे महत्व आपण जाणून घेतल्यास आपल्या मध्ये नक्की आध्यत्मिक परिवर्तन शक्य आहे.' असे स्पष्ट केले. यावेळी मुख्य पुरोहित आणि तीर्थ मंदिराचे प्रमुख फादर ज्यो डिमेलो, फादर डेनिस घोन्सालवीस, फादर सिल्वेस्टर रेगो, फादर थॉमस मीराङ्डा, फादर कॅजिटन आणि फादर एँथोनी यांची विशेष उपस्थिती होती. दिवसभरात अन्य समाजाच्या भाविकांनी सुद्धा फातिमा मातेचे मनोभावे दर्शन घेतले. त्यानंतर भाविकांनी स्नेह भोजनाचा लाभ घेतला.

## सुनील गोरेगावकर यांना शिवभूमी आदर्श शिक्षक पुरस्कार



**माणगाव : बातमीदार**

रायगड जिल्ह्यातील माणगाव तालुक्यातील सुनिल गोरेगावकर यांना सन २०२२-२०२३ ते २०२५-२०२६ या चार वर्षांतील रायगड जिल्हा शिवभूमी आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. हा पुरस्कार सोमवार, दि. १३ ऑक्टोबर २०२५ रोजी अलिबाग येथे झालेल्या भव्य सोहळ्यात देण्यात आला.

या कार्यक्रमास फलोत्पादन व रोजगार हमी योजना मंत्री नामदार भरत गोगावले, महिला व बालकल्याणमंत्री आदिती तटकरे तसेच अलिबागचे आमदार महेंद्र दळवी हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

या मान्यवरांच्या हस्ते सुनिल गोरेगावकर यांना सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र व पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. त्यांच्या या सन्मानाबद्दल रेपोली ग्रामस्थ, मित्रपरिवार, अधिकारी वर्ग, आणि सर्व समाजघटकांकडून हार्दिक अभिनंदन व कौतुकाचा वर्षाव होत आहे.

## महेश म्हसे यांना आदर्श ग्रामसेवक पुरस्कार

**चौक : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील ग्रूप ग्रामपंचायत माडप आणि लोधीवली ग्रामपंचायत अधिकारी महेश म्हसे यांना रायगड जिल्हा परिषदेच्या वतीने आदर्श ग्रामसेवक पुरस्कार देण्यात आला.

ग्रामपंचायत अधिकारी महेश म्हसे रोहा तालुक्यातील धोडखार ग्राम पंचायत मध्ये काम करताना विविध योजनांची अंमलबजावणी करून ग्रामीण भागातील लोकांचे जीवनमान उंचावणे चे काम करत असताना त्यांच्या अडिअडचणी सोडविण्याचे प्रामाणिक काम केले. म्हणूनच त्यांना सन २०१९/२० या वर्षाचा रायगड जिल्हा परिषद यांना आदर्श ग्रामसेवक प्रदान करण्यात आला.



## आदर्श ग्रामसेवक अभिजित माने यांचा रानवली ग्रामपंचायतीकडून सन्मान



**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषदेने 'आदर्श ग्रामसेवक' पुरस्काराने सन्मानित केलेल्या अभिजित माने यांचा रानवली ग्रामपंचायतीतर्फे भव्य सत्कार सोहळा रविवारी (दि. १९ ऑक्टोबर) सायंकाळी पार पडला. ग्रामपंचायत सभागृहात झालेल्या या कार्यक्रमात परिसरातील नागरिक, सरपंच, सदस्य आणि समाजसेवकांनी उपस्थित राहून अभिजित माने यांच्यावर कौतुकाचा वर्षाव केला.

सत्कार सोहळ्याचे अध्यक्षस्थान सरपंच सुरेश मांडवकर यांनी भूषविले. कार्यक्रमास उपसरपंच अताउल्ला जालगावकर, सदस्य समीर पोफलणकर, भाविका जोशी, शितल धामणकर, भाविका काप, दत्ताराम डोईफोडे तसेच समाजसेवक राजू जाधव आदी मान्यवर उपस्थित होते.

## चिमुकल्यांनी साकारली ऐतिहासिक पन्हाळा किल्ल्याची प्रतिकृती

**मुरुड : प्रतिनिधी**

दिवाळीचे औचित्य साधून मुरुड बाजारपेठेतील उमेश गोबरे यांच्या दोन लहान मुले नील व हर्ष यांनी ऐतिहासिक पन्हाळ गड किल्ल्यांची (पुष्टी बुरुज) प्रतिकृती साकारली आहे.



राजे शिवछत्रपती महाराजांचे किल्ले बनवत असताना अंगावर काटे येतात हा किल्ला बनविण्यासाठी शेतातुन माती, दगड व विटा आणुन पाण्यात भिजवून माती नरम केली जाते.आणि हा किल्ला बनविला जातो.आपला किल्ला हुबेहूब व्हावा यासाठी मावळे,तोफा, किल्ल्याचे प्रवेशद्वार, शेतकरी, महिला -पुरुष, द्वारपाल, छत्रपती शिवाजी महाराज, विविध वस्तू हे बाजारातुन विकत आणतो.तद्नंतर कागदावर स्वतः हा डिझाईन करतो आणि कलर देतो हा किल्ला उभारताना आनंद जणू गड जिंकल्या सारखा होता.अशि प्रतिक्रिया नील व हर्ष यांनी दिली.

शिवरायाचा इतिहास सांगताना अंगावर काटा येतो राजे होते म्हणून आपण आहोत.

पाठ्यपुस्ताकात राजे शिवछत्रपती महाराजांचा धडा असावा पण काही धुर्त राज्यकर्त्यांनी हे धडे गायब केले तरी ही इतिहास पुसला जात नाही. तो पुन्हा पाठ्यपुस्तकातुन परत आणावा, अशी मागणी करण्यात येत आहे.

## देगाव आदिवासीवाडीत दिवाळी फराळ वाटप

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव तालुक्यातील देगाव येथे दि. २० ऑक्टोबर २०२५ रोजी दिवाळीच्या शुभ पर्वानिमित्त आज चेरीजन फाऊंडेशन आणि सामाजिक कार्यकर्त्या यशोधरा गोडबोले यांच्या वतीने देगाव आदिवासी वाडी येथे दिवाळी फराळ वाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

या उपक्रमाद्वारे समाजातील आदिवासी आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांपर्यंत आनंदाची गोडी पोहोचविण्यात आली. दिवाळी सणाचा उत्साह आणि सामाजिक एकात्मतेचा संदेश देत सर्वांनी एकत्रितपणे सण साजरा केला.

या कार्यक्रमादरम्यान उपस्थित आदिवासी महिलांनी समाजाने दिलेलं आपल्यावर एक देणे आहे या भावनेतून प्रेरित होऊन उपजीविकेसाठी स्वावलंबनाच्या वाटेवर पाऊल टाकण्याचा निर्धार व्यक्त केला.

## रोटरी क्लबतर्फे ग्रामपंचायत सफाई कामगारांना दिवाळी फराळ

**मोहोपाडा,आपटा : प्रतिनिधी**

रोटरी क्लब ऑफ पाताळगंगा यांच्या वतीने रसायनी परिसरातील मोहोपाडा, चांभार्ली, रिस, कांबे, वावेघर, तुराडे, गुळसुंदे आदी ठिकाणी वासांबे मोहोपाडा ग्रामपंचायत आणि तुराडे ग्रामपंचायत येथील सर्व सफाई कामगारांना दिवाळी फराळाचे वाटप करण्यात आले.यावेळी कामगारांच्या चेहऱ्यावर आनंद दिसत होता.

सामाजिक बांधिलकी जपत वर्षभर विविध सामाजिक उपक्रम राबविले जातात. शाळेसाठी लागणाऱ्या वस्तू,विद्यार्थ्यांना शाळोपयोगी वस्तूंचे वाटप,अपंगाना मदत आदी उपक्रम सुरुच असतात. सध्याची परिस्थिती पाहता या महागाईच्या काळात सर्वानाच सण साजरे करणे अवघड होताना दिसत आहें.



आणि त्याच अनुषंगाने याही वर्षी रसायनी पारिसरातील सर्वात मोठी असणारी वासांबे मोहोपाडा ग्रामपंचायत आणि तुराडे ग्रामपंचायत येथील सर्व सफाई कामगारांना दिवाळी फराळाचे वाटप करण्यात आले.यावेळी कामगारांच्या चेहऱ्यावर आनंद दिसत होता.

या सामाजिक कामामुळे रोटरी क्लब ऑफ पाताळगंगा यांचे विविध स्तरातून कौतुक केले जात आहे. यावेळी अध्यक्ष विजय पाटील व इतर मान्यवर उपस्थित होते.


## जाहिर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळवीणेत येते की मौजे आरिवली, तहसील- पनवेल, जिल्हा- रायगड, येथील खाली वर्णन करणेत आलेली शेतजमीन विद्यमान कब्जेदार कै. सिताराम पुरुषोत्तम पाटणकर व कै. कृष्णाजी सिताराम पाटणकर यांचे कायदेशीर वारस १. श्री योगेश कृष्णाजी पाटणकर २. श्री उमेश कृष्णाजी पाटणकर, यांचेकडून आमचे अशिलानी कायम खरेदी घेणेचा व्यवहार ठरविला आहे, महसूल दप्तरी असलेले सदर शेतजमीनीचे वर्णन खालिलप्रमाणेः

**शेतजमीनीचे वर्णन**
**मौजे आरिवली, तहसील पनवेल जिल्हा रायगड येथील जिल्हा परीषद रायगड, पंचायत समिती पनवेल, मे. दुय्यम निबंधक पनवेल यांचे अधीकार क्षेत्रातील,**

| गट क्रमांक व उपविभाग | भोगवटादार वर्ग | क्षेत्र: लावणी लायक | क्षेत्र: पोटखराबा | क्षेत्र: एकुण क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|---|---|
| | | हे. आर. प्रती | हे.आर.प्रती | हे.आर.प्रती | रू. पै |
| ११७/२ | १ | ०-१७-०० | ०-०१-२० | ०-१८-२० | ३.१६ |

वरील शेतजमीन/मिळकत या बाबत अन्य कोणाही व्यक्तीचा गहाण, दान, बक्षीस, साठेकरार, फरोक्त, पोटगी, वारसा वा तत्सम कोणतेही प्रकारचे दस्ताने कोणतेही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथम दर्शनी पुराव्या सहीत सदर नोटीस प्रसिध्द झालेपासुन १० दिवसाचे आत पोहचतील अश्या खाली सही करणार खरेदीदाराचे वकील यांचेकडे रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. वरील मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे असे समजणेत येवुन सदर खरेदी व्यवहार विद्यमान मालक यांच्या बरोबर पूर्ण केला जाईल व मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

**ठिकाण : पनवेल**
**दिनांक : २०/१०/२०२५**
**कार्यालयीन पत्ता**
**शॉप नं. १५४, पनवेल महानगरपालिका शॉपिंग कॉम्पलेक्स, दत्त झेरॉक्सच्या वरती, ता. पनवेल, जिल्हा रायगड ४१०२०६**

**सही/-**
**ॲड. स्वप्निल व्यं जाधव**
**बी.ए.एल.एल.बी.**
**( खरेदीदारचे वकिल)**

## जाहिर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळवीणेत येते की मौजे भिंगार, तहसील- पनवेल, जिल्हा- रायगड, येथील खाली वर्णन करणेत आलेली शेतजमीन विद्यमान कब्जेदार कै. सिताराम पुरुषोत्तम पाटणकर व कै. कृष्णाजी सिताराम पाटणकर यांचे कायदेशीर वारस १. श्री योगेश कृष्णाजी पाटणकर २. श्री उमेश कृष्णाजी पाटणकर, यांचेकडून आमचे अशिलानी कायम खरेदी घेणेचा व्यवहार ठरविला आहे, महसूल दप्तरी असलेले सदर शेतजमीनीचे वर्णन खालिलप्रमाणे:

**शेतजमीनीचे वर्णन**
**मौजे भिंगार, तहसील पनवेल जिल्हा रायगड येथील जिल्हा परीषद रायगड, पंचायत समिती पनवेल, मे. दुय्यम निबंधक पनवेल यांचे अधीकार क्षेत्रातील,**

| गट क्रमांक व उपविभाग | भोगवटादार वर्ग | क्षेत्र: लावणी लायक | क्षेत्र: पोटखराबा | क्षेत्र: एकुण क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|---|---|
| | | हे. आर. प्रती | हे.आर.प्रती | हे.आर.प्रती | रू. पै |
| ११३/६ | १ | ०-४५-७० | ०-९०-६० | ०-५५-३० | १०.७५ |

वरील शेतजमीन/मिळकत या बाबत अन्य कोणाही व्यक्तीचा गहाण, दान, बक्षीस, साठेकरार, फरोक्त, पोटगी, वारसा वा तत्सम कोणतेही प्रकारचे दस्ताने कोणतेही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथम दर्शनी पुराव्या सहीत सदर नोटीस प्रसिध्द झालेपासुन १५ दिवसाचे आत पोहचतील अश्या खाली सही करणार खरेदीदाराचे वकील यांचेकडे रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. वरील मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे असे समजणेत येवुन सदर खरेदी व्यवहार विद्यमान मालक यांच्या बरोबर पूर्ण केला जाईल व मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

**ठिकाण : पनवेल**
**दिनांक : २०/१०/२०२५**
**कार्यालयीन पत्ता**
**शॉप नं. १५४, पनवेल महानगरपालिका शॉपिंग कॉम्पलेक्स, दत्त झेरॉक्सच्या वरती, ता. पनवेल, जिल्हा रायगड ४१०२०६**

**सही/-**
**ॲड. स्वप्निल व्यं जाधव**
**बी.ए.एल.एल.बी.**
**( खरेदीदारचे वकिल)**

## जाहिर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळवीणेत येते की मौजे वारदोली, तहसील- पनवेल, जिल्हा- रायगड, येथील खाली वर्णन करणेत आलेली शेतजमीन विद्यमान कब्जेदार श्री. प्रदिप नथुराम बताले, यांचेकडून आमचे अशिलानी कायम खरेदी घेणेचा व्यवहार ठरविला आहे, महसूल दप्तरी असलेले सदर शेतजमीनीचे वर्णन खालिलप्रमाणे::

**शेतजमीनीचे वर्णन**
**मौजे वारदोली, तहसील पनवेल जिल्हा रायगड येथील जिल्हा परीषद रायगड, पंचायत समिती पनवेल, मे. दुय्यम निबंधक पनवेल यांचे अधीकार क्षेत्रातील,**

| गट क्रमांक व उपविभाग | भोगवटादार वर्ग | क्षेत्र: लावणी लायक | क्षेत्र: पोटखराबा | क्षेत्र: एकुण क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|---|---|
| | | हे. आर. प्रती | हे.आर.प्रती | हे.आर.प्रती | रू. पै |
| १२०/३ | १ | ०-०६-०० | ०-०२-०० | ०-०८-०० | ०.०९ |

वरील शेतजमीन/मिळकत या बाबत अन्य कोणाही व्यक्तीचा गहाण, दान, बक्षीस, साठेकरार, फरोक्त, पोटगी, वारसा वा तत्सम कोणतेही प्रकारचे दस्ताने कोणतेही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथम दर्शनी पुराव्या सहीत सदर नोटीस प्रसिध्द झालेपासुन १५ दिवसाचे आत पोहचतील अश्या खाली सही करणार खरेदीदाराचे वकील यांचेकडे रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. वरील मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे असे समजणेत येवुन सदर खरेदी व्यवहार विद्यमान मालक यांच्या बरोबर पूर्ण केला जाईल व मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

**ठिकाण : पनवेल**
**दिनांक : २०/१०/२०२५**
**कार्यालयीन पत्ता**
**शॉप नं. १५४, पनवेल महानगरपालिका शॉपिंग कॉम्पलेक्स, दत्त झेरॉक्सच्या वरती, ता. पनवेल, जिल्हा रायगड ४१०२०६**

**सही/-**
**ॲड. स्वप्निल व्यं जाधव**
**बी.ए.एल.एल.बी.**
**( खरेदीदारचे वकिल)**

# भाजपच्या वतीने दिवाळीच्या पार्श्वभूमीवर कार्यकर्ता स्नेहसंमेलन मेळावा संपन्न





**नवी मुंबई : प्रतिनिधी, बातमीदार**

दीपावलीच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पार्टी, नवी मुंबई आयोजित आमदार मंदा म्हात्रे यांच्या वतीने रविवारी कै. गणपतशेठ तांडेल मैदान येथे कार्यकर्ता स्नेहसंमेलन मेळावा पार पडला.

यावेळी आमदार मंदा म्हात्रे यांनी भाजप कार्यकर्त्यांशी संवाद साधत मिठाईच वाटप केले. याच स्नेह मेळाव्यात आग्रोळी गावातील कन्या डॉ. आदिती दिलीप वैद्य हिने डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठात एमडीएस मध्ये प्रथम क्रमांक पटकावून गोल्ड मॅडलिस्ट प्राप्त केल्याबद्दल माजी विरोधी पक्ष नेता पंढरीनाथदादा पाटील यांच्या शुभहस्ते डॉ. आदिती हिचा सत्कार करण्यात आला. तसेच शिरवणे गाव येथे २० ऑगस्ट २५ दिवशी झालेल्या जबरी घरफोडीतील सुमारे २२,९०,००० रुपये किंमतीचे सोने व चलनी नोटा नेरुळ पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक ब्रह्मनंद नाईकवाडी व त्यांच्या पथकाने केलेल्या कौशल्यपूर्ण तपासात आरोपीकडून जप्त करण्यात आल्या होत्या. वपोनि ब्रह्मनंद नाईकवाडी आणि पथक यांनी केलेल्या या यशस्वी कामगिरी बद्दल आमदार मंदा म्हात्रे यांनी सर्वांचा जाहीर सत्कार केला.

या कार्यकर्ता सस्नेमेळाव्यात आगामी मनपा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर आ.मंदा म्हात्रे यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. यावेळी भाजपा जिल्हाध्यक्ष डॉ. राजेश पाटील, माजी उपमहापौर अनिल कौशिक, महामंत्री व माजी नगरसेवक निलेश म्हात्रे, दीपक पवार, काशिनाथ पाटील, माजी नगरसेविका अनिता शेट्टी, युवा मोर्चा अध्यक्ष निकेतन पाटील, महामंत्री दत्ता घंगाळे, माजी पोलीस पाटील दिलीप पाटील, राजू तिकोने, भाजपा कार्यकर्ते, पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कामगारांच्या वेतनाचे धनादेश मिळाल्याने अखेर १७ दिवसांनंतर आंदोलन स्थगित

**नवी मुंबई : बातमीदार**



महानगरपालिकेतील उद्यान विभागात कार्यरत कामगारांना किमान वेतन दिले जात नाही, यासाठी समाज समता कामगार संघाच्या माध्यमातून उद्यान विभागातील कामगारांनी ०९ दिवस साखळी आणि ८ दिवस आमरण उपोषण केले होते. १७ दिवसाच्या उपोषणनंतर शुक्रवारी उशिरा अतिरिक्त आयुक्त डॉ. राहुल गेठे यांनी उपोषण कर्त्यांना लाडू भरवून उपोषणाची सांगता केली. कामगारांना सुधारित वेतनाचे धनादेश देण्यात आल्याने कामगारांमध्ये आनंदाचे वातावरण होते. यापुढे सर्वांना सुधारित वेतन देण्याचे निश्चित करण्यात आले आहे.

नवी मुंबई महानगरपालिकेच्या बेलापूर ते दिघा विभाग कार्यालय कार्यक्षेत्र क्षेत्रात एकूण १७ लाख ००५०३ चौरस मीटर क्षेत्रफळात उद्यान विकसित करण्यात आलेले आहे. या उद्यानात कार्यरत कामगारांना किमान वेतन आणि लेव्हीचे सर्व फायदे देणे बंधनकारक आहे. परंतु उद्यान विभागातील ठेकेदारांशी, उद्यान विभागातील उद्यान विभागातील अधिकाऱ्यांचे आर्थिक हितसंबंध असल्याने साधारण ४० कामगारांना किमान वेतन दिले जात नव्हते. याबाबत वारंवार पत्रव्यवहार करण्यात आला होता. परंतु याकडे दुर्लक्ष केले जात होते.

महानगरपालिकेच्या धोरणाप्रमाणे २ हजार २०० चौरस मीटर साठी एक कामगार याप्रमाणे १७ लाख ००६०३ क्षेत्रफळासाठी ७७३ कामगार कार्यरत असणे आवश्यक आहे. प्रत्यक्षात मात्र उद्यान विभागात साडेचारशे कामगार कार्यरत आहेत उर्वरित २०० कामगारांचे वेतनाचे पैसे अधिकारी आणि ठेकेदार दरमहा वाटून घेत आहेत असा आरोप कामगार नेते मंगेश लाड यांनी केला आहे.

त्यातच जे कामगार कामाला आहेत त्यांनाही किमान वेतन देण्यास कंत्राटदाराकडून टाळाटाळ केली जात आहे. जे कामगार उपोषणास बसले आहेत त्यांना दरमहा बारा हजार रुपयेच वेतन मिळत होते. जर महानगरपालिका एका कामगारासाठी २७ हजार रुपये खर्च करत असेल आणि कामगाराला फक्त १२ हजार ००० रुपये मिळत असतील तर उरलेले १५ हजार ००० रुपये कोणाच्या खिशात जातात असा प्रश्न लाड यांनी उपस्थित केला होता. त्यामुळेच उद्यान विभागाचे अधिकारी या बाबीकडे दुर्लक्ष करून स्वतः चा खिसा गरम करून घेत आहेत असा समाज समता कामगार संघाचा आरोप होता. वारंवार विनंती करूनही कामगारांना किमान वेतन मिळत नसल्यामुळे कामगारांनी आमरण उपोषणाचे हत्यार उपसले होते.

# कामोठ्यात पार्लरमालकाकडून महिलेचा विनयभंग

## संतप्त जमावाने बेदम चोपला, पोलिसांत गुन्हा

**पनवेल : वार्ताहर**

कामोठे येथील सेक्टर १५ मधील 'लुक अॅण्ड लाईक युनिसेक्स पार्लर'मध्ये एका महिलेचा विनयभंग केल्याप्रकरणी पार्लरच्या मालकाविरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेनंतर संतप्त नागरिकांनी आरोपीला बेदम मारहाण केली असून, संपूर्ण प्रकार सीसीटीव्ही कॅमेर्यात कैद झाला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडित महिला केशकर्तन व केस रंगविण्यासाठी संबंधित पार्लरमध्ये गेल्या होत्या. त्या वेळी पार्लरचा मालक दानीश शहा (वय २१) याने गळ्यापर्यंत मसाज करण्याच्या बहाण्याने महिलेसोबत गैरवर्तन केले. महिलेने विरोध दर्शवत जाब विचारला असता, आरोपीने उद्धटपणे वर्तन केलं. संतप्त झालेल्या महिलेनं घटनेची माहिती आपल्या शेजार्यांना व नातेवाईकांना दिली. यानंतर गुरुवारी रात्री संतप्त नागरिकांनी पार्लरवर धडक देत आरोपी दानीशला बेदम चोप दिला. या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर वेगाने व्हायरल झाला असून, परिसरात चर्चेचा विषय ठरला आहे.

घटनेची माहिती मिळताच कामोठे पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. पीडितेचा जबाब नोंदविल्यानंतर आरोपी विरुद्ध विनयभंगाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वरिष्ठ पोलीस निरीक्षक विमल बिडवे यांनी घटनेची गंभीर दखल घेतली असून, तपास सुरू असल्याचे सांगीतले आहे. या प्रकारामुळे परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले असून, महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. पोलिसांनी नागरिकांना कायदा हातात न घेण्याचे आवाहन केले आहे.

# पनवेलमध्ये धम्मचक्र प्रवर्तन दिन सोहळा आणि कौटुंबिक मेळावा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



बौद्धजन पंचायत समिती शाखा क्रमांक ७४१ अंतर्गत माता रमाई महिला मंडळ तक्षशिला तरुण मित्र मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने ६९वा धम्मचक्र प्रवर्तन दिन सोहळा व कौटुंबिक मेळावा रविवार दिनांक १९ ऑक्टोबर २०२५ रोजी सेक्टर ९ खांदा कॉलनी, नवीन पनवेल येथे झाला.

सदर कार्यक्रमास प्रमुख प्रशांत ठाकूर आमदार पनवेल विधानसभा, किशोर देवधेकर कार्याध्यक्ष पनवेल विधानसभा मतदारसंघ राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, एकनाथ गायकवाड माजी नगरसेवक, गणेश पाटील माजी नगराध्यक्ष, भिमराव पवार, दशरथ म्हात्रे, जयंत भगत, नितीन विचारे, सचिन गायकवाड आदी उपस्थित होते.

प्रमुख वक्ते नागसेन गमरे कोषाध्यक्ष भोजन पंचायत समिती भोईवाडा, अंकुश मोहिते अध्यक्ष तक्षशिला सामाजिक व सांस्कृतिक संस्था स्वागत अध्यक्ष नथुराम साखरे अध्यक्ष बौद्धजन पंचायत समिती शाखा क्रमांक ७४१, सूत्रसंचालन अभिजीत जाधव सचिव बौद्धजन पंचायत समिती ७४१, स्वागत पुष्पा जाधव अध्यक्ष माता रमाई महिला मंडळ, बौद्धजन पंचायत समिती शाखा ७४१ बहुजन पंचायत समिती शाखेचे उपाध्यक्ष भगवान कांबळे, उपसचिव प्रशांत गमरे, खजिनदार जिनावस कदम, संदेश वाहक विक्रम गमरे

तसेच बहुजन पंचायत समिती शाखा क्रमांक ७४१ चे सर्व पदाधिकारी भाजपचे कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार, गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार, सेवानिवृत्त सभासदांचा सत्कार, करण्यात आला अशा प्रकारे धम्मचक्र परिवर्तन दिन सोहळा व कौटुंबिक मेळावा संपन्न झाला.

# राजे शिवराय प्रतिष्ठानने साकारली श्री जलदुर्ग खांदेरीची भव्य प्रतिकृती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



राजे शिवराय प्रतिष्ठानने रविवार दि.१९ऑक्टोबर रोजी आयोजित केलेला दुर्ग दर्शन सोहळ्याचा उदघाटन आमदार प्रशांत ठाकूर यांचे हस्ते झाले .ह्या वर्षी राजे शिवराय प्रतिष्ठानने श्री जलदुर्ग खांदेरी याची भव्य प्रतिकृती साकारली आहे. ह्या सोहळ्यास शिवशंभू विचारमंच, कोकणप्रांतची जबाबदारी असलेले शिवचरित्र अभ्यासक व लेखक अजय जगताप यांच्या वाणीतून हिंदुत्वाचे विचार उपस्थित सर्व प्रेक्षक वर्गाला ऐकायला मिळाले. आमदार प्रशांत ठाकूर यांनी राजे शिवराय प्रतिष्ठानने साकारलेल्या श्री जलदुर्ग खांदेरी याची भव्य प्रतिकृतीचे कौतुक करुन मंडळाला शुभेच्छा दिल्या .

तसेच ह्या सोहळ्यास आचार्य प्रल्हादजी महाराज शास्त्री (वसुधैव कुटुंबकम आध्यात्म पीठ श्री मलंगड), श्री महेशजी पवळे (संस्थापक- राजे शिवराय प्रतिष्ठान), श्री शिवाजी खरात(अध्यक्ष- राजे शिवराय प्रतिष्ठान पुणे), श्री अतुल गोणते (राजे शिवराय प्रतिष्ठान पुणे शहर अध्यक्ष, श्री विक्रम वसंत पाटील (श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान पनवेल प्रमुख) आदि मान्यवर उपस्थित होते. श्री जलदुर्ग खान्देरीची प्रतिकृती आपल्या सर्वांना २५ ओक्टोम्बर पर्यंत पाहता येणार आहे. २५ ऑक्टोबर रोजी दीपोस्तव साजरा करून ह्या दुर्ग दर्शन सोहळ्याची सांगता होईल.



पनवेल : दै. महाराष्ट्र सम्राटच्या पुस्तकाचे प्रकाशन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते सोमवारी करण्यात आले. या पुस्तकामध्ये लोकनेते रामशेठ ठाकूर आणि आमदार प्रशांत ठाकूर यांच्या २०२३ ते २०२५ दरम्यानच्या काळात प्रसिद्ध झालेल्या बातम्यांचा संकलन करून त्यांचा कामाच्या कर्तृत्वाचा आलेख संपादक गणेश भोईटे यांनी मांडला आहे. या वेळी भोईटे यांच्यासह पत्रकार मदन बडगुजर, साहिल रेळेकर, उद्योजक भार्गव ठाकूर आदी उपस्थित होते.



पनवेल : पत्रकार विजय पवार संपादित इंद्रधनु दिवाळी अंकाचे प्रकाशन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते झाले. या वेळी ज्येष्ठ पत्रकार गणेश कोळी, संजय कदम, दीपक घोसाळकर, सुमंत नलावडे, हनीफ कच्छी, सुजाता नलावडे, अनुष्का पवार, आस्था पवार आदी उपस्थित होते.



पनवेल : लोकनेते माजी खासदार रामशेठ ठाकूर यांना दिवाळीनिमित्त शुभेच्छा देताना न्हावेचे माजी सरपंच हरिश्चंद्र म्हात्रे, किशोर घरत व यश म्हात्रे.



उरण : भाजप दक्षिण मंडळ सोशल मीडिया सेल अध्यक्ष सुबोध ठाकूर यांनी आमदार महेश बालदी यांना दिवाळी शुभेच्छा दिल्या.

# झेंडूच्या फुलांच्या भावात घसरण

**पनवेल : वार्ताहर**

दसऱ्याला किरकोळ बाजारात झेंडूला किलोला १२० ते १६० रुपयांचा भाव होता; पण सध्याच्या दिवाळी सणामध्ये १०० ते १२० रुपये किलो आहे. फुलांच्या भावातील घसरण २० ते २५ टक्के असली तरी सणासुदीला भावात घसरण झाल्याने विक्रेते हवालदिल झाले आहेत. दसरा सणात घाऊक बाजारात १०० ते १२० रुपये किलोने विकली जाणारी झेंडूची फुले दिवाळी सणात ७० ते १०० रुपये भावाने फुले विकली जात आहेत; मात्र बाजारात दर्जेदार फुलांचा पुरवठा होत असताना अपेक्षित भाव मिळत नसल्याने शेतकऱ्यांमध्ये निराशा आहे. किरकोळ बाजारात गावाकडून काही शेतकरी फुले विक्रीसाठी टेम्पोत घेऊन आल्याने झेंडूच्या फुलांना आकारमानानुसार ६० ते ८० रुपये प्रतिकिलोने होत आहे. दसऱ्याला २०० ते २२० रुपये असणारी शेवंतीची फुले १२० ते १५० रुपये किलो भावाने विकली जात आहेत.

## मोटारसायकलची चोरी

**पनवेल :** करंजाडे टी पॉईंट जवळील ब्रिजच्या खाली उभी करून ठेवलेली मोटारसायकल अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना घडली. दैवदीप गालट यांनी त्यांची ५० हजार रुपये किमतीची काळ्या रंगाची होंडा कंपनीची मोटरसायकल नंबर एमएच ४६. बीटी ३३९७ उभी करून ठेवली असता ती अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याने याबाबतची टँकर पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.



पनवेल : ज्येष्ठ पत्रकार प्रमोद वालेकर संपादित दै. किल्ले रायगडच्या ५९व्या दिवाळी विशेषांकाचे प्रकाशन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते सोमवारी झाले. या वेळी सहसंपादक प्रदीप वालेकर, व्यवस्थापक तुषार तटकरी, सा. रायगड प्रभातचे संपादक विजय पवार, प्रसिद्धी प्रमुख हरेश साठे, पत्रकार उमेश भोईर आदी उपस्थित होते.

# बोरघाटातील हाईट्स बॅरिकेट्सला लोखंडी कवच

**खोपोली : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे जुन्या महामार्गावरील उभारण्यात आलेल्या हाईट्स बॅरिकेट्स पोलादी कमानीला सुरक्षा कवच म्हणून दोन्ही बाजूला लोखंडी पाईपच्या कमानी टाकण्यात आल्या आहेत, जेणेकरून मोठ्या आणि मजबूत कमानीला सुरक्षा कवच होईल.

मुंबई-पुणे महामार्गावरून मोठी आणि अवजड वाहने ही बोरघाटातून खोपोलीकडे येत असतात. त्यामुळे अनेक अपघात होऊन होऊन अनेकांना आपला जीव गमवावा लागला आहे. यावर उपाय म्हणून बोरघाट महामार्ग पोलीस आणि आयआरबी यंत्रणेने दस्तुरी येथील अंडा पॉईंटडजवळ अडीच मिटरची कमान आणि जुन्या पोलीस चौकीजवळ कमान अशा दोन कमानी टाकण्यात आल्या आहेत, जेणेकरून अवजड वाहने ही बोरघाटातून खोपोलीकडे न जाता ती थेट एक्सप्रेस वेने खोपोली फाटा आणि मुंबईकडे जातील. या कमानी टाकल्याने बोरघाटातील खोपोलीकडे जाणारी मोठी वाहने पूर्णपणे बंद झाली असून अपघात कमी झाले आहेत, मात्र दस्तूरी येथील हाईट्स बॅरिकेट्सला काही वाहनचालक आपली वाहने जाणीवपूर्वक धडकून कमानी तोडतात आणि त्या ठिकाणाहून वाहतूक सर्रासपणे चालू होते.



यावर उपाय म्हणून आणि या पोलादी कमानी सुरक्षित राहाव्या यासाठी दोन्ही बाजूला लोखंडी पाईपच्या दुसऱ्या कमानी टाकण्यात आल्या आहे, जेणेकरून मोठ्या कमानीला कोणत्याही प्रकारचा अडथळा येणार नसून कमानी मजबूत राहतील.

**बोरघाटात झालेल्या अपघातात मोठ्या प्रमाणात जीवितहानी झाली होती. अशा दुर्घटनांवर निर्बंध आणण्यासाठी हाईट बॅरिकेट्सचा पर्याय निवडला होता. त्याला पूर्णपणे आले, मात्र बेशिस्त वाहनचालकांनी वारंवार हाईट बॅरिकेट्सला धडक देऊन ते निकामी केले होते. आता त्यांचे मजबुतीकरण करण्यात आले आहे.**

**–गुरूनाथ साठीलकर**
**अध्यक्ष, हेल्प फाउंडेशन**

## दादर सागरी पोलिसांची गावठी हातभट्टी अड्ड्यावर धाड

### ८३ हजारांचा मुद्देमाल जागेवरच केला नष्ट

**पेण : प्रतिनिधी**

पेण तालुका हद्दीतील दादर सागरी पोलीस ठाण्याचे निरीक्षक संजयकुमार ब्राह्मणे यांच्या मार्गदर्शनाखाली रावे गावच्या हद्दीत खाडीकिनारी कांदळवन जंगल भागात अवैध गावठी हातभट्टी दारूचा व्यवसाय धाड टाकून उद्ध्वस्त करण्यात आला.

मिळालेल्या माहितीनुसार पोलीस उपनिरीक्षक एकनाथ सकपाळ, सहाय्यक फौजदार संदेश ठाकूर, हवालदार अतीश पाटील, नंदन पाटील, नितीश पाटील, योगेश म्हात्रे, शिपाई मयूर पाटील, ऋषिकेश आगम यांच्या पथकाने दोन पंचांना सोबत घेऊन अवैध धंद्यावर धाड टाकली. तेथे गावठी हातभट्टी दारू बनविण्याचे एकूण ८३ हजार ५०० रुपये किमतीचे रसायन व साहित्य मिळून आले. मिळालेले साहित्य हे अवजड असल्याने जागीच नष्ट करण्यात आले असून त्याचा सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे.

या प्रकरणी आरोपींविरुद्ध पोलीस शिपाई ऋषिकेश आगम यांनी सरकारतर्फे फिर्याद दिली आहे. त्यावरून दादर सागरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास निरीक्षक संजयकुमार बाह्मणे यांच्या मार्गदर्शनाखाली हवालदार नितीश पाटील करीत आहेत.

## मुरूड तालुक्याच्या विकासासाठी खासदार तटकरेंकडून निधीचे मंजुरीपत्र



**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड तालुक्यातील ग्रामीण भागाच्या विकासासाठी खासदार सुनील तटकरे यांनी जिल्हा नियोजन समितीमार्फत दोन कोटी ८२ लाख रुपयांच्या निधीचे मंजुरीपत्र दिले आहे. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी आभार मानले आहेत.

सुतारवाडी येथे खासदार तटकरे यांनी दोन कोटी ८२ लाख रुपयांच्या विविध कामांच्या मंजुरीचे पत्र राष्ट्रवादीचे मुरूड तालुका अध्यक्ष फैरोज घलटे, प्रमुख नेते मनोज भगत, माजी नगराध्यक्ष मंगेश दांडेकर, सोशल मीडिया सेलचे जिल्हा उपाध्यक्ष हसमुख जैन, माजी सभापती बाबू नागावकर, माजी सरपंच अजित कासार, कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती संतोष कांबळी आदींना सुपूर्द केले.

या निधीतून चिंचघर डॅम रस्ता, तेलवडे अंतर्गत रस्ता, काकळघर रस्ता, मजगावमधील रस्ता, बारशीव समशानभूमी रस्ता, कोर्लई येथील रस्ता, वावे गावातील रस्ता होणार आहे. जिल्हा नियोजनमधून मंजूर कामे लवकरच पूर्ण होणार आहेत. याबद्दल राष्ट्रवादीचे मनोज भगत यांनी खासदार तटकरे यांचे आभार व्यक्त केले.

## पेण दिव येथे मूर्ती प्रतिष्ठापना

**पेण : प्रतिनिधी**

दिव येथील ज्ञानदेव बाळाराम म्हात्रे यांनी गावदेवी व जरूमरू देवींच्या मूर्ती योगदान म्हणून आणून दिल्या. या दोन्ही मूर्तींची प्रतिष्ठापना नुकतीच करण्यात आली.

यानिमित्त म्हात्रे यांच्या घरापासून टाळ-मृदंगाच्या साथीने भजनाच्या गजरात संपूर्ण गावातून देवींची मिरवणूक काढण्यात आली. फटाक्यांचीही आतषबाजी करण्यात आली. मिरवणूक झाल्यावर दोन्ही मूर्ती गावदेवी मंदिरात प्रतिष्ठापित करण्यात आल्या. दुसऱ्या दिवशी मूर्तींना अभिषेक घालण्यात आला. पंचक्रोशीतील भाविक, ग्रामस्थ यांचे या होमवनास सहकार्य लाभले. संगीत भजनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

## युवा नेते विक्रम साबळे यांचा वाढदिवस उत्साहात

### समाजोपयोगी उपक्रम; मान्यवरांकडून शुभेच्छा



**खोपोली : प्रतिनिधी**

भाजप युवा नेते विक्रम यशवंत साबळे यांचा वाढदिवस मोठ्या उत्साहात विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला. या निमित्ताने महाराजा मंगल कार्यालयात राजकीय, सामाजिक तसेच अन्य निरनिराळ्या स्तरातील मान्यवरांनी उपस्थित राहून साबळे यांना वाढदिवसाच्या तसेच पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या

साबळे कुटुंबातील युवा नेतृत्व व विक्रम साबळे फाउंडेशनचे अध्यक्ष विक्रम यशवंत साबळे यांच्या वाढदिवसानिमित्ताने मोफत आरोग्य तपासणी व भव्य रक्तदान शिबिर घेण्यात आले. याचा लाभ खोपोली व परिसरातील शेकडो गरजूंनी शिबिरात उपस्थित राहून घेतला. विशेष म्हणजे खोपोली व परिसरातील भजनी मंडळांना याकरिता आमंत्रित करण्यात आले. त्यांच्यापैकी प्रतिनिधी स्वरूपात पाच जणांना सन्मानित करण्यात आले.

शिवसेनेचे कुलदीपक शेंडे, राष्ट्रवादीचे सुनील पाटील, माजी नगराध्यक्ष तथा राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते दत्तात्रेय मसुरकर, मंगेश दळवी या मान्यवरांनीही विक्रम साबळे यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.

पोलीस निरीक्षक सचिन हिरे, भाजपचे जिल्हा सरचिटणीस दीपक बेहेरे, किसान मोर्चाचे जिल्हाध्यक्ष बडगुजर, कर्जतचे उपनगराध्यक्ष अशोक ओसवाल, हेमंत नांदे, राजेश भगत, महिला मोर्चा माजी शहराध्यक्ष अश्विनी यत्रे, माजी नगरसेवक अविनाश तावडे, चंद्रप्पा अनिवार, माजी उपनगराध्यक्ष श्रीकांत पुरी, ॲड. रामदासपाटील, ए.जी. पाटील, माजी नगरसेवक मोहन अवसरमल, सूर्यकांत देशमुख, डॉ. नागरगोजे, सुमती महर्षी, अपर्णा मोरे, संजय म्हात्रे, विकास खुरपुडे, अजय इंगुलकर, उद्योजक मुस्तफा दुसते, हास्य क्लबचे बाबुभाई ओसवाल यांच्यासह विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## दुर्गोत्सव २०२५ : ‘अमृत’चा विश्वविक्रमी संकल्प

### छत्रपतींना अनोखी मानवंदना देण्यासाठी घरोघरी साकारताहेत दुर्ग

**रायगड : रामप्रहर वृत्त**

दीपावलीत महाराष्ट्रात ‘अमृत’ संस्थेच्या वतीने दुर्गोत्सव २०२५ अंतर्गत एक आगळावेगळा आणि विश्वविक्रमी उपक्रम साकारण्यात येत आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाची साक्ष देणाऱ्या १२ ऐतिहासिक गडदुर्गांच्या हुबेहूब प्रतिकृती नागरिकांनी स्वतःच्या घरासमोरील अंगणात, बाल्कनीत किंवा सार्वजनिक जागांमध्ये साकाराव्यात, असे आवाहन ‘अमृत’चे व्यवस्थापकीय संचालक विजय जोशी यांनी केले आहे.

पुणे येथील शिवसृष्टी हिस्टोरिकल थीम पार्क येथे दुर्गोत्सवाचे औपचारिक अनावरण करण्यात आले. या वेळी ‘अमृत’चे वरिष्ठ अधिकारी श्रीराम बेंडे, प्रवीण पांडे, सदेहश्वर वरंगावकर, तसेच राज्य व्यवस्थापक दीपक जोशी उपस्थित होते.

दरवर्षी दिवाळीच्या सुट्टीत बालमंडळी मातीचे किल्ले तयार करून शिवरायांना अभिवादन करतात. याच परंपरेला भव्य रूप देत ‘अमृत’ने गडदुर्ग बनवण्याच्या या उपक्रमास अधिक व्यापक व जागतिक पातळीवर नेले आहे.

रायगड, राजगड, प्रतापगड, पन्हाळा, शिवनेरी, लोहगड, साल्हेर, सिंधुदुर्ग, विजयदुर्ग, सुवर्णदुर्ग, खांदेरी आणि जिंजी (तामिळनाडू) या १२ दुर्गांपैकी कोणत्याही एका दुर्गाची प्रतिकृती नागरिकांनी साकारावी आणि त्यासोबतचा सेल्फी www.durgotsav.com या संकेतस्थळावर अपलोड करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

दुर्गोत्सवात सहभागी झालेल्या प्रत्येक व्यक्तीचे छायाचित्र संकलित करण्यात येणार असून त्या सर्वांना मुख्यमंत्री यांच्या स्वाक्षरीने अभिनंदन पत्र प्रदान केले जाईल. हा उपक्रम केवळ किल्ले बनवण्यापुरता मर्यादित नसून महाराष्ट्राच्या इतिहासाचे दर्शन घडवणारा एक वैचारिक आणि शैक्षणिक उत्सव ठरणार आहे.

अमृत विद्यया या डिजिटल शिक्षण प्लॅटफॉर्मवर छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावर आधारित ९९९ किमतीचे प्रशिक्षण पूर्णपणे मोफत उपलब्ध करून देण्यात आले आहे. या कोर्समध्ये स्वराज्यरक्षक दुर्ग, शिवचरित्रातील महत्त्वाच्या घटना, कवि भूषण यांची काव्यरचना आणि स्वराज्यासाठी लढलेले महान योद्धे यांचा समावेश करण्यात आला आहे.

या दुर्गोत्सवात उपक्रमात जिल्ह्यातील नागरिकांनी विशेष योगदान देण्याचे आवाहन जिल्हाधिकारी किशन जावळे, जिल्हा व्यवस्थापक शैलेश मराठे आणि उपजिल्हाधिकारी रवींद्र शेळके यांनी केले आहे.

## सुहास वारेंना आदर्श ग्रामसेवक पुरस्कार



**चौक : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील वडगाव ग्रामपंचायतीचे अधिकारी सुहास विष्णू वारे यांचा रायगड जिल्हा परिषदेच्या वतीने आदर्श ग्रामसेवक पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. याबद्दल त्यांचे अभिनंदन होत आहे.

ग्रामपंचायत अधिकारी सुहास विष्णू वारे हे सन २०१८ ते २०१९ या कालावधीत पनवेल तालुक्यात ग्रामसेवक म्हणून कार्यरत होते. विविध योजनांची अंमलबजावणी करून ग्रामीण भागातील लोकांचे जीवनमान उंचावण्याचे तसेच त्यांच्या अडीअडचणी सोडविण्याचे काम वारे यांनी केले. म्हणूनच त्यांना आदर्श ग्रामसेवक पुरस्कार महिला व बालकल्याणमंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते व रायगड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांच्या उपस्थितीत प्रदान करण्यात आला.

ग्रामपंचायत अधिकारी सुहास विष्णू वारे हे आता खालापूर तालुक्यातील वडगाव ग्रामपंचायत येथे कार्यरत असून त्यांनी माझी वसुंधरा अभियान ५.० यात कोकण विभागातून प्रथम येण्याचा मान मिळवून दिला आहे. त्याचप्रमाणे मुख्यमंत्री माझी शाळा यातही कोकण विभागातून प्रथम येण्याचा मान मिळवून ग्रामपंचायत राज्य स्तरावर काम करण्यास सुरुवात केली आहे. त्यांचे पुरस्काराबद्दल गटविकास अधिकारी संदीप कराड, विस्तार अधिकारी शैलेंद्र तांडेल, विनोद चांदोरकर यांनी अभिनंदन केले.

## शैला तुरे यांना पुरस्कार प्रदान

**नागोठणे :** कराडे स्पोर्ट्स अकॅडमी रायगड आयोजित ग्लोबल सोसियल एक्सलंट कॉन्फरन्स व अवार्ड सेरोमनी ठाणे यांच्यातर्फे शिवछत्रपती महाराष्ट्र समाज गौरव पुरस्कार पेण तालुक्यातील खारपाले येथील सामाजिक कार्यकर्त्या शैला प्रमोद तुरे यांना लोकगीत गायक संतोष चौधरी (दादुस) तसेच इतर मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

कार्यक्रमाला शिवछत्रपती पुरस्कार विजेते कबड्डीपटू रवींद्र करमळकर, ज्येष्ठ अभिनेते जयराज नायर, आतंरराष्ट्रीय टेबल टेनिसपटू जयेंद्र करडे, सिने अभिनेते झाकीर खान, जेष्ठ साहित्यिक हेमंत बोळवकर आदी उपस्थित होते.

## रायगडात ‘अंनिस’चे फटाकेमुक्त दिवाळी अभियान

**पाली : प्रतिनिधी**

तिमिरातून तेजाकडे नेणारा, नवी उर्जा, प्रकाश, आनंद, उत्साह, नवचेतना देणारा आणि विवेक जागृत ठेवणारा सण म्हणजे दिवाळी. या सणात सर्वचजण आनंद व प्रेम देत अन् घेत असतात, मात्र या आनंदावर बऱ्याचवेळा फटाक्यांच्या दुष्परिणामामुळे विरजण पडण्याची शक्यता नाकारता येत नाही. हे टाळण्यासाठी मागील वीस वर्षांपासून महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मुलन समिती फटाके मुक्त दिवाळी अभियान राबवित आहे. यंदाही हे अभियान जिल्ह्यात राबविले जात आहे.

फटाके वाजवून खरे तर विध्वंसक वृत्ती वाढू शकते तसेच वायू व ध्वनी प्रदुषणही वाढते. पर्यावरण ऱ्हासाबरोबरच सभोवतालच्या प्राण्यांनादेखील फटाक्यांचा त्रास होतो. त्यामुळे अनेक सुज्ञ पालक व शिक्षक आपल्या मुलांना दिवाळीत फटाके न फोडण्यास प्रोत्साहित करताना दिसत आहेत. फटाक्यांच्या दुष्परिणामांची माहितीही देत आहेत.

फटाके फोडण्याऐवजी मुलांना पुस्तक वाचन, किल्ले बांधणी, आकाशकंदील व भेटकार्ड बनविणे, रांगोळी काढणे अशा रचनात्मक उपक्रमात सहभागी करून घेत आहेत तसेच फटाक्यांचे पैसे वाचवून त्या पैशांत अवांतर वाचनाची पुस्तके विकत घेण्यास मुलांना प्रोत्साहित केले जाताना दिसत आहे. केवळ सामाजिक बांधिलकी आणि पर्यावरण संवर्धनासाठी लाखो रुपयांचे उत्पन्न बंद करण्याचे धाडस फार कमी लोक करतात. हे धाडस करुन दाखविले आहे पेण येथील रोहन मनोरे या तरुणाने. जवळपास दहा वर्ष मोठ्या जोमात सुरु असलेले फटाक्यांचे दुकान एका झटक्यात बंद करुन फटाके विक्री शून्यावर आणण्याचा संकल्प केला.

पेण येथील चिंचपाडा येथे मनोरे यांचे काही वर्षापुर्वी फटाक्यांचे एकमेव दुकान अगदी स्थिरस्थावर झालेले होते. दिवाळीत ग्राहकांनी गजबजलेले आणि दरवर्षी जवळपास तीन ते चार लाख रुपयांची उलाढाल असलेले. चाईल्ड सोशल वर्कर म्हणून लहान मुले घडविण्याचे समाजसेवी काम करत असताना आपण फटाक्याच्या माध्यमातून पर्यावरण दुषित आणि मानवी आरोग्य बिघडविण्याचे काम तर करत नाही ना? याची खंत रोहन यांना वाटत होती. मग त्यांना फटाकेमुक्त अभियानाची ओळख झाली आणि क्षणाचाही विचार न करता सन २०१२ला त्यांनी आपले उत्तम सुरु असलेले फटाक्यांचे दुकान बंद करण्याचा निर्णय घेतला.

आई वृंदा व वडील वसंत मनोरे यांनी त्यांच्या या समाजोपयोगी निर्णयाला मोलाची साथ देत होकार दिला. तेव्हापासून ते फटाके मुक्तीच्या चळवळीत कार्य करत आहेत.

### वाचलेल्या पैशातून विधायक कामे

*‘अंनिस’च्या माध्यमातून विद्यार्थ्यांना फटाकेमुक्त दिवाळी साजरी करून किमान शंभर रुपये वाचवा आणि वाचविलेल्या पैशातून चांगली पुस्तके, खेळणी, भेटवस्तू, मिठाई, गरिबांच्या घरी फराळ देणे, त्यांना आर्थिक, शैक्षणिक मदत करणेसारख्या सामजिक कार्यांसाठी प्रोत्साहित करण्यात येते. काही शाळेतील विद्यार्थ्यांनी फटाके न फोडता वाचविलेल्या पैशातून शाळेच्या वाचनालयाला पुस्तके दिली, काही विद्यार्थ्यांनी या वाचलेल्या पैशातून वर्गातील गरीब विद्यार्थ्यांना चप्पल व बॅगा दिल्या, काही शाळेतल्या प्रत्येक विद्यार्थ्यांनी आपल्या घरी बनविलेले दिवाळीचे पदार्थ आणले व झोपडपट्टीतील मुलांना देऊन त्यांच्यासोबत दिवाळी साजरी करतात. पालीतील विनय निकुंभ हा विद्यार्थी फटाक्यांच्या वाचलेल्या पैशातून गरिबांना फराळाचे वाटप करतो. अशी अनेक उदाहरणे आहेत.*

### सोशल मीडियातून जनजागृती

*‘अंनिस’तर्फे फेसबुक, ट्विटर, व्हॉट्सअपद्वारे फटक्याच्या दुष्परिणामांची माहिती प्रसारित करणे यांसारख्या अभिनव पद्धतीचा अवलंब करण्यात येत आहे. या माध्यमातून अधिकाधिक लोकांपर्यंत सहज पोहचता येते.*

**महाराष्ट्र ‘अंनिस’मार्फत राबविल्या जाणाऱ्या फटाकेमुक्त दिवाळी अभियानाला चांगला प्रतिसाद मिळत आहे तसेच सर्वांनी फक्त दिवाळीतच नाही, तर वेगवेगळ्या धर्मातील सणांच्या दिवशी, निवडणुका, मिरवणूक, वाढदिवस अशा प्रसंगी प्रदूषणकारी फटाक्यांचा वापर टाळावा.**

**–मोहन भोईर, जिल्हा कार्याध्यक्ष,**
**महाराष्ट्र अंनिस, रायगड जिल्हा**

## पनवेलमध्ये दुर्ग बांधणी स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद

**रायगड : रामप्रहर वृत्त**

पनवेल येथील महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या वासुदेव बळवंत फडके इंग्लिश मीडियम स्कूलतर्फे अमृत दुर्गोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. छत्रपती शिवाजी महाराजांच्या दुर्गनिर्मिती परंपरेला अभिवादन म्हणून शाळेत दुर्ग बांधणी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

या उपक्रमात विद्यार्थ्यांना १२ गटांमध्ये विभागून विविध ऐतिहासिक दुर्गांची प्रतिकृती साकारण्यास प्रवृत्त करण्यात आले. विद्यार्थ्यांनी रायगड, प्रतापगड, शिवनेरी, सिंहगड यांसारख्या किल्ल्यांचे हुबेहूब वास्तू साकारून शिवकालीन वास्तुकलेचा आणि इतिहासाचा भव्यतेने आविष्कार केला.




या स्पर्धेचे परीक्षण नामवंत इतिहास अभ्यासक आणि मोडी लिपी संशोधक पंकज भोसले यांच्या हस्ते करण्यात आले. श्री. भोसले हे ‘हेमाद्री’ मासिकाच्या माध्यमातून मोडी लिपीचे संवर्धन करत असून ऐतिहासिक खेळांच्या कार्यशाळांद्वारे विद्यार्थ्यांमध्ये इतिहासाची रूची निर्माण करण्याचे कार्य सातत्याने करत आहेत. स्पर्धेतील विजेत्यांना त्यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र व सन्मानचिन्ह देऊन गौरवण्यात आले.

रायगड ‘अमृत’चे प्रतिनिधी शैलेश मराठे यांनी लवकरच ‘शिवचरित्र स्पर्धा २०२६’ घेण्यात येणार असून त्याच्या तयारीसाठी प्राथमिक चर्चा सुरू आहे. या स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांना छत्रपतींच्या चरित्राचा सखोल अभ्यास करता येईल, असे म्हटले.

# महिला वर्ल्डकपमध्ये सेमीफायनलचे तीन संघ ठरले!

## उर्वरित एका स्थानासाठी भारत आणि न्यूझीलंडमध्ये चुरस



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

महिला एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेत भारतीय क्रिकेट संघाला सलग तिसरा पराभव पत्करावा लागला. इंग्लंडने भारताचा अवघ्या चार धावांनी पराभव करत उपांत्य फेरीत आपले स्थान निश्चित केले आहे, मात्र अंतिम चारमध्ये स्थान मिळवण्याच्या भारताच्या आशा अजूनही कायम आहेत.

इंदूर येथील होळकर स्टेडियमवर झालेल्या सामन्यात इंग्लंडने भारताचा पराभव करून महिला विश्वचषक स्पर्धेच्या उपांत्य फेरीत प्रवेश निश्चित केला. या विजयासह इंग्लंडने उपांत्य फेरीत आपले स्थान पक्के केले आहे. ऑस्ट्रेलिया आणि दक्षिण आफ्रिकेचे संघ यापूर्वीच अंतिम चारमध्ये पोहचले आहेत.


दुसरीकडे भारतीय महिला संघाचा हा सलग तिसरा पराभव आहे. यापूर्वी त्यांना दक्षिण आफ्रिका आणि ऑस्ट्रेलियाकडूनही पराभव पत्करावा लागला होता. त्यामुळे भारत आता 'करो या मरो' अशा स्थितीत आहे. या विश्वचषकात भारतीय महिला संघाने खेळलेल्या पाच सामन्यांमध्ये फक्त पाकिस्तान आणि श्रीलंका यांच्याविरुद्धच विजय मिळवला आहे. असे असले तरी भारत उपांत्य फेरीसाठी पात्र ठरू शकतो.

सध्या उपांत्य फेरीतील एक स्थान रिक्त आहे. भारताचा न्यूझीलंडविरुद्धचा पुढील सामना दोन्ही संघांसाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. गुणतालिकेत सध्या भारत चौथ्या, तर न्यूझीलंड पाचव्या स्थानी आहे. दोन्ही संघांचे प्रत्येकी चार गुण असले तरी भारताचा नेट रनरेट न्यूझीलंडपेक्षा किंचित चांगला आहे. जर भारतीय संघाने न्यूझीलंडचा पराभव केला, तर ते थेट उपांत्य फेरीत प्रवेश करतील.

हरमनप्रीतच्या नेतृत्वाखालील संघ न्यूझीलंडकडून पराभूत झाला, तरीही त्यांच्या उपांत्य फेरीतील प्रवेशाची शक्यता कायम राहू शकते. यासाठी भारताला स्पर्धेतील अखेरच्या टप्प्यात असलेल्या बांगलादेशचा पराभव करावा लागेल आणि न्यूझीलंडने लीग फेरीतील त्यांच्या शेवटच्या सामन्यात इंग्लंडकडून पराभूत व्हावे लागेल.

# पंच प्रवीण पाटील यांची राष्ट्रीय किकबॉक्सिंग स्पर्धेसाठी निवड

**पेण : प्रतिनिधी**



पेण तालुक्यातील शिर्की गावचे वीण पाटील यांची आसाम येथे राष्ट्रीय किकबॉक्सिंग स्पर्धेकरिता पंच म्हणून निवड करण्यात आली आहे.

भारतीय किक बॉक्सिंग फेडरेशनच्या विद्यमाने २६ ते ३० ऑक्टोबरदरम्यान आसामच्या उत्तर लखीमपूर येथील त्याग खेत्रा इनडोअर स्टेडियममध्ये वरिष्ठ, ज्युनियर आणि सब ज्युनियर राष्ट्रीय किकबॉक्सिंग चॅम्पियनशिप आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेत संपूर्ण भारतातील सुमारे ६००हून अधिक खेळाडू आणि अधिकारी सहभागी होणार आहेत. प्रवीण पाटील यांची सलग सात वेळा विविध राज्यात राष्ट्रीय किकबॉक्सिंग स्पर्धांमध्ये पंच म्हणून निवड झालेली आहे. मार्शल आर्ट क्षेत्रात प्रदीर्घ अनुभव असलेले तसेच एक शिस्तबद्ध कोच व पंच म्हणून त्यांची महाराष्ट्र किकबॉक्सिंग असोसिएशन तसेच भारतीय किकबॉक्सिंग महासंघात ओळख आहे. त्यांना स्पर्धेसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

# ॲथलेटिक्स स्पर्धेत 'सीकेटी'चे विद्यार्थी चमकले

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राज्य क्रीडा व युवक संचालनालय अंतर्गत रायगड जिल्हा क्रीडा कार्यालय आणि पनवेल महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरीय ॲथलेटिक्स स्पर्धा पोलीस मुख्यालय रोडपाली येथे झाली. या स्पर्धेत नवीन पनवेलमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांनी सुयश प्राप्त केले आहे.



रितेश रमेश भगत (इ. बारावी) १०० मीटर धावणे प्रथम, लांब उडी प्रथम, ट्रिपल जम्प द्वितीय; अनिकेत रतन जाधव (इ. बारावी) लांब उडी तृतीय, ४X१०० रिलेमध्ये मुलींचा संघ प्रथम यात समीक्षा रमेश सैद, त्रिशा विनोद राव, रूपाली संतोष साळवे, खुशी भगीरथसिंह राजपुरोहित, स्नेहा रामेश्वर राजपूत (सर्व इ. बारावी); रूपाली संतोष साळवे ४०० मीटर धावणे प्रथम, समीक्षा रमेश सैद (इ. बारावी) १०० मीटर धावणे प्रथम, तर त्रिशा विनोद राव (इ. बारावी) हिने ८०० मीटर धावणे प्रथम व १५०० मीटर धावणे शर्यतीत द्वितीय क्रमांक प्राप्त केला आहे.

प्रथम व द्वितीय क्रमांक प्राप्त विद्यार्थ्यांची मुंबई विभागीय ॲथलेटिक्स स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या यशाबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख, अध्यक्ष अरुणशेठ भगत, सचिव डॉ.एस.टी. गडदे, प्राचार्य प्रशांत मोरे, पर्यवेक्षक अजित सोनवणे व स्वाती पाटील, क्रीडा शिक्षक अरुण पाटील, मनोज पाटील तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी या सर्वांनी विजेत्या खेळाडूंचे अभिनंदन केले तसेच पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.




# रायगडच्या विद्यार्थ्यांचे राष्ट्रीय लाठी स्पर्धेत सुयश




**उरण : बातमीदार**

राजस्थानमधील अलवर परशुराम बाबा हॉलमध्ये राष्ट्रीय पारंपरिक लाठी स्पर्धा आयोजित करण्यात आली होते. या स्पर्धेत साडेतीनशे विद्यार्थी विविध राज्यातून सहभागी झाले होते. यामध्ये रायगड जिल्ह्यातील विद्यार्थ्यांनी सुयश प्राप्त केले.

रोहित शरद घरत याने लाठी वारमध्ये सुवर्ण व पट्टाबाजीत रौप्य, गोपाळ दिनकर म्हात्रेने एकलाठी व पट्टाबाजीत रौप्यपदक, तर नेहा रोहित घरतने एकलाठीमध्ये कांस्यपदक प्राप्त केले. त्यांना सिहान राजू कोळी यांनी मार्गदर्शन केले. विजेत्या खेळाडूंचे अभिनंदन होत आहे.

दरम्यान, राष्ट्रीय रेफरी कमिशनमध्ये गोपाळ म्हात्रे यांची सभासद म्हणून व महाराष्ट्र महासचिव राजू कोळी यांची राष्ट्रीय मॅनेजमेंट कमिटीमध्ये चेअरमनपदी नियुक्ती करण्यात आली आहे. या नियुक्तीबद्दल दोघांना शुभेच्छा देण्यात आल्या.

# शालेय क्रीडा स्पर्धांमध्ये चौक शाळेची दमदार कामगिरी

**रसायनी : प्रतिनिधी**

विविध शालेय क्रीडा स्पर्धांमध्ये चौक येथील सरनौबत नेताजी पालकर विद्यामंदिर व यशवंतराव देशमुख कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी शैक्षणिक वर्ष २०२५-२६मध्ये उल्लेखनीय आणि दमदार कामगिरी करून आपली छाप पाडली आहे.

मुंबई विभागस्तरीय स्क्वॅश स्पर्धेत १७ वर्षाखालील मुलींच्या गटात सोनिया वाघमारे हिने सुवर्णपदक पटकावले असून तिची व साहिल वाघमारे यांची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

रायगड जिल्हा व खालापूर तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धांमध्येही चौक शाळेच्या संघांनी चमकदार कामगिरी केली आहे. खो-खो खेळात १४ वर्षाखालील मुले व मुली प्रथम, १७ वर्षाखालील मुले प्रथम, १७ वर्षाखालील मुली द्वितीय, १९ वर्षाखालील मुले व मुलींनी द्वितीय क्रमांक प्राप्त केला.

कबड्डीत १४ वर्षाखालील मुलींनी प्रथम व १७ वर्षाखालील मुले द्वितीय क्रमांक मिळवला. याशिवाय मैदानी स्पर्धांमध्येही शाळेच्या खेळाडूंनी १४, १७ व १९ वर्षाखालील वयोगटात एकूण १२ सुवर्ण, १६ रौप्य आणि आठ कांस्यपदके मिळवत शाळेचा झेंडा उंचावला आहे. या सर्व खेळाडूंना शाळेचे क्रीडा शिक्षक व प्रशिक्षक शरद कुंभार सर यांनी प्रशिक्षित केले आहे.

शाळेच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल विद्या प्रसारिणी सभा चौक संस्थेचे उपाध्यक्ष ॲड. अविनाश देशमुख, कार्याध्यक्ष शोभाताई देशमुख, उपकार्याध्यक्ष नरेंद्र शहा, सेक्रेटरी योगेंद्र शहा तसेच सर्व शिक्षकांनी खेळाडू व प्रशिक्षकांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# नॅशनल क्रश स्मृती होणार इंदूरची सून!

## बॉयफ्रेंड पलाश मुछालने उघड केले नाते

**इंदूर : वृत्तसंस्था**



भारतीय महिला क्रिकेट टीमची व्हाईस कॅप्टन आणि स्टार ओपनर स्मृती मंधाना तिच्या खेळासोबतच खासगी आयुष्यामुळेही सध्या चर्चेत आहे. स्मृती आणि संगीत दिग्दर्शक-फिल्ममेकर पलाश मुछाल यांच्या प्रेमसंबंधांची चर्चा बऱ्याच दिवसांपासून मीडियामध्ये आणि सोशल मीडियावर सुरू आहे, पण आता खुद्द पलाश मुछाल यांनी एका कार्यक्रमात 'लवकरच लग्न करणार' असल्याचे संकेत देऊन या चर्चांना पूर्णविराम दिला आहे.

पलाश मुछालने त्याच्या मूळ गावी इंदूरमध्ये स्टेट प्रेस क्लबच्या 'रू-ब-रू' कार्यक्रमादरम्यान पत्रकारांशी संवाद साधला. स्मृती मंधानासोबतच्या खास नात्याबद्दल विचारले असता, पलाश यांनी हसत हसत एक मोठी 'हेडलाईन' दिली. ३० वर्षीय पलाश मुछालनं सांगितलं, ती (स्मृती मंधाना) खूप लवकर इंदूरची सून होईल... मला फक्त एवढंच सांगायचं आहे. पलाश यांच्या या वक्तव्यानंतर उपस्थितांनी टाळ्या वाजवून आनंद व्यक्त केला. मी तुम्हाला हेडलाईन दिली आहे, असे हसून तो म्हणाला.

स्मृती मंधाना (वय २७)चा बॉयफ्रेंड पलाश मुछाल (वय २९) हा संगीतकार आणि चित्रपट निर्माता आहे. त्याने अनेक बॉलीवूड गाण्यांना संगीत दिले आहे. पलाश मुछाल मूळचा इंदूरचा रहिवासी आहे. स्मृती आणि पलाश यांच्या वयात केवळ दोन वर्षांचा फरक आहे. स्मृती २७ वर्षांची, तर पलाश २९ वर्षांचा आहे.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com